cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२३२ | रविवार, दि.१५ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### राष्ट्रवादीचे एकीकरण अशक्यच्या गटात मोडत नाही

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजितदादादा पवार यांच्यातील कौटुंबिक भेट चर्चेच्या केंद्रस्थानी असतानाच शरद पवार गटाचे बडे नेते व भाजपाच्या केंद्रीय नेत्यांमध्ये दिल्लीत खलबते झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या राजकारणात पुन्हा नवे समीकरण जन्माला येण्याची चिन्हे दिसून येऊ लागली आहेत. लोकसभा निवडणुकीत भरवशाच्या महाराष्ट्रातच मोदी सरकारची मोठी पीछेहाट झाली. ४८ पैकी केवळ १७ जागांवर महायुतीला समाधान मानावे लागले. तर महाविकास आघाडीने ३० जागा पटकावल्या.

### संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना आदरांजली

नवी दिल्ली : २३ वर्षांपूर्वी १३ डिसेंबर २००१ रोजी देशाच्या संसदेवर दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यातील शहीदांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आदरांजली वाहिली. देशातील प्रमुख नेत्यांसह सामान्य जनतेनेही शहिदांना आदरांजली अर्पण केली. राष्ट्रपती द्रौपदी या घटनेच्या आठवणीवर व्यक्त होत म्हणाल्या की, २००१ मध्ये आजच्या दिवशी संसदेची सुरक्षा सांभाळताना जे शहीद झाले त्यांना मी श्रद्धांजली अर्पण करते. सर्व शहिदांचे धैर्य आणि निस्वार्थ सेवा आपल्याला सतत प्रेरणादायी आहे. आपला देश त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा मनापासून ऋणी आहे.

# शेतकऱ्यांवर पाण्यासह रॉकेट लाँचर, अन् रबरी गोळ्या झाडल्या

## शंभू सीमेवर तणाव! अनेक आंदोलक शेतकरी जखमी, इंटरनेटवर बंदी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

हरियाणाच्या शंभू सीमेवर शेतकऱ्यांच्या आंदोलनाची स्थिती बिकट झाली आहे. दिल्लीकडे निघालेल्या १०१ शेतकऱ्यांना पोलिसांनी आडवले. शेतकऱ्यांना थोपवण्यासाठी हरियाणा पेलिसांनी बॅरिकेड्स लावले. त्यांच्यावर पाण्याचा मारा करण्यात आला असून अश्रुधूराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. शेतकऱ्यांवर रबरी गोळया झाडल्याने १७ शेतकरी जखमी झाले आहेत. दरम्यान मोर्चाच्या पार्श्वभूमीवर हरियाणा सरकारने अंबाला जिल्ह्यातील १२ गावांमधील इंटरनेट बंदी १८ डिसेंबर पर्यंत



वाढवली आहे.

हमीभाव कायद्यासह इतर मागण्यांसाठी पंजाब आणि हरियाणातील शेतकरी आणि शेतकरी संघटनांनी दिल्ली चलोचा नारा दिला आहे. शेतकरी किसान मजदूर मोर्चा आणि एसकेएमच्या नेतृत्वात गेल्या १० महिन्यापासून शंभू आणि खनौरी सीमेवर शेतकरी आंदोलन करत आहेत. शनिवारी (दि.१४) शंभू सीमेवर आंदोलन करणाऱ्या १०१ शेतकऱ्यांच्या तिसऱ्या गटाने दिल्लीकडे कूच केली. यावेळी शेतकऱ्यांना थांबवण्यासाठी पान २ वर

### पंतप्रधान आणि केंद्रीय कृषिमंत्र्यांचेही मौन

किसान मजदूर मोर्चाचे नेते सर्वनसिंह पंढेर यांनी, यावरून सरकारवर टीका केली आहे. यावेळी पंढेर यांनी, शनिवारी १०१ शेतकऱ्यांच्या एका गटाने दिल्लीकडे कूच करण्याचा आणखी एक प्रयत्न केला. पण पोलीस तो दडपण्याचा प्रयत्न करत आहेत. आम्ही केंद्र आणि राज्य सरकार आमच्याशी चर्चा करेल, याची वाट पाहत आहोत. मात्र सरकार गप्प आहे. आपले पंतप्रधानही याबाबत मौन बाळगून अंतर राखून आहेत. केंद्रीय कृषिमंत्रीही या आंदोलनाबाबत बोलत नाहीत. भाजपचे काही खासदार नको ती 'वक्तव्य' करून समाजात फूट पडण्याचे काम करत आहेत, असा दावा पंढेर यांनी यावेळी केला.

### देशभरातील शेतकऱ्यांनी आता आवाज उठवण्याची गरज

शेतकरी आंदोलन दिल्लीपर्यंत पोहचू नये, यासाठी सर्व सरकारी यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. तर पंजाब आणि हरियाणातील सर्व शेतकरी एकत्र आले तरी ते आंदोलन यशस्वी करू शकत नाहीत. हेच त्यांना सिद्ध करायचे आहे. तसेच देशभरातील शेतकऱ्यांनी आता आवाज उठवण्याची गरज असून असे केले तरच शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होतील. तरच शेतकऱ्यांना दिल्लीला जाण्याची परवानगी दिली जाईल. हरियाणा पोलीस जनतेची दिशाभूल करत असून १०१ लोक पायी दिल्लीकडे चालत जात आहेत. यामुळे देशाला काय धोका असू शकतो? असाही सवाल पंढेर यांनी उपस्थित केला आहे.

# एक देश, एक निवडणूक विधेयक उद्या लोकसभेत मांडले जाणार

नवी दिल्ली । वृत्तसेवा

'एक देश, एक निवडणूक' विधेयक सोमवारी लोकसभेत सादर केले जाईल. भारत देशात लोकसभा आणि राज्य विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्यात याव्यात, निवडणूक प्रक्रिया अधिक प्रभावी, किफायतशीर आणि वेळेची बचत करण्यासाठी हे विधेयक प्रस्तावित करण्यात आले आहे. या माध्यमातून केंद्र आणि राज्यांच्या निवडणुकांमध्ये सामंजस्य प्रस्थापित करून राजकीय स्थैर्य वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल हे विधेयक लोकसभेत मांडणार आहेत. ते सविस्तर चर्चेसाठी संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवले जाईल. एक देश, एक निवडणूक यासाठी दोन सुधारणा विधेयके आणली जातील. यापैकी एक विधेयक लोकसभा आणि




राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकाचवेळी घेण्यासाठी तर दुसरे विधेयक दिल्ली, जम्मू-काश्मीर आणि पाँडीचेरी विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी असेल.

केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच या विधेयकाला मंजुरी दिली असून २०३४ नंतर देशात एकाचवेळी निवडणुका घेण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी राज्यघटनेत बदल केले जातील, ज्यामध्ये कलम ८३, १७२ आणि ३२७ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय केंद्रशासित प्रदेश आणि जम्मू-काश्मीर पुनर्रचना कायद्यातही बदल करण्यात येणार आहेत.

# काँग्रेसच्या कपाळावरचे आणीबाणीचे पाप कधीच धुतले जाणार नाही-मोदी



नवी दिल्ली । वृत्तसेवा

संविधानला ७५ वर्षे पूर्ण झाले आहेत. जेव्हा देश संविधानाची २५ वर्षे साजरी करत होता, तेव्हा देशात इमर्जन्सी लावण्यात आली. संवैधानिक व्यवस्थेला संपवण्यात आले आणि देशाला जेलखाना बनवले गेले. नागरिकांच्या अधिकारांना संपवण्यात आले. काँग्रेसच्या कपाळावरचे हे पाप कधीच धुतले जाणार नाही.

भारताच्या संविधानाच्या ७५ व्या वर्षानिमित्त लोकसभेतील चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उत्तर दिले. यावेळी बोलताना मोदींनी पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी यांच्यासह काँग्रेसवर सडकून टीका पान २ वर

# देवाभाऊंचे शिलेदार आज घेणार शपथ

## नागपुरात जंगी तयारी; मराठवाड्याला योग्य स्थान मिळणार

नागपुर । प्रतिनिधी

**महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार आणि नव्या मंत्र्यांचा शपथविधी सोहळा रविवार, दि. १५ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वा. नागपुर येथे राजभवनात होत आहे. यावेळी देवाभाऊंचे शिलेदार मोठ्या उत्साहात शपथ घेणार असून कोणत्या भागाला कसे स्थान दिले जाते हे निश्चित होईल. या विस्तारात पंकजा मुंडे, धनंजय मुंडे यांच्यासह मराठवाड्याला चांगले स्थान दिले जाण्याची दाट शक्यता आहे.**

मंत्रीमंडळ विस्तार हा नागपुरातील राजभवनात होणार आहे. मंत्रिमंडळ विस्ताराच्या पार्श्वभूमीवर शनिवारी दिवसभर घडामोडींना वेग आला होता. अनेक नेते पक्षश्रेष्ठींच्या गाठी-भेटी घेताना दिसत होते. मुंबईतील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर सकाळपासून चांगलीच वर्दळ वाढल्याचे दिसून आले. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या बंगल्यावर सुध्दा संभाव्य मंत्र्यांची गर्दी होती.

विधानसभेचा निकाल हा २३ नोव्हेंबरला लागला असला तरी नविन सरकार हे ५ डिसेंबरला अस्तित्वात आले. फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यावर सुध्दा खातेवाटपाच्या तिढ्यामुळे विस्तार लांबणीवर गेला. अखेर १० दिवसानंतर मुहुर्त ठरलाच. पहिल्यांदाच मुंबईऐवजी नागपुरला मंत्रिमंडळाचा शपथविधी होणार असून राज्यभरातून आपल्या नेत्याला मंत्रीपद मिळणार या आशेने कार्यकर्ते नागपुरात शनिवारीच दाखल झाले आहेत. तर मंत्रीपद मिळावे यासाठी अनेक आमदार आपल्या नेत्यांकडे चकरा मारत होते. शेवटी फडणवीसांचे शिलेदार हे नागपुरात रविवारी मंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. त्यामुळे नेमकी वर्णी कोणाची लागणार हे त्याच वेळी कळणार आहे.







### देवेंद्र फडणवीसांच्या फोननंतरच मंत्रीपद पक्क!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शपथ घेणाऱ्या मंत्र्यांना स्वत: फोन करुन शपथविधीबाबत सांगणार आहेत. त्यामुळे ज्यांना सीएमचा फोन जाईल, त्यांचेच मंत्रीपद पक्क असणार आहे. त्यामुळे फडणवीसांच्या फोनच्या प्रतिक्षेत संभाव्य मंत्री आहेत.

### १९९१ नंतर पहिल्यांदाच नागपूरात शपथविधी

येत्या १६ डिसेंबरपासून सरकारचे हिवाळी अधिवेशन नागपुरात पार पडणार आहे. त्यापूर्वी १५ डिसेंबरला संध्याकाळी ४ वाजता मंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. खरंतर १९९१ नंतर पहिल्यांदाच नागपूरात हिवाळी अधिवेशन, मंत्रिमंडळ विस्तार आणि मंत्रिपदाच्या शपथविधीचा सोहळा पार पडणार आहे.

### मंत्रीपदाचा नवा फॉर्मुला

भाजप 22, शिंदेसेना 12, अजित पवार गट 09

### सागर बंगल्यावर नेत्यांची गर्दी; बीडमधून तिघे भेटले

रविवारी मंत्र्यांचा शपथविधी होणार असल्याने शनिवारी फडणवीस यांना भेटण्यासाठी अनेकांनी हजेरी लावली. बीडमधून तीन नेत्यांनी फडणवीसांची भेट घेतली असून यात माजलगावचे आ. प्रकाश सोळंके, केजच्या आ. नमिता मुंदडा, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा समावेश आहेत. या शिवाय राहुल आवाडे -भाजप, राधाकृष्ण विखे पाटील -भाजप, कुमार उत्तमचंद आईलानी -भाजप, संजय राठोड -शिवसेना, संजय शिरसाट - शिवसेना, रावसाहेब दानवे - भाजप, राजू पाटील -मनसे, बंटी बांगडिया -भाजप यांनी फडणवीसांची सागर बंल्यावर जावून भेट घेतली.

### कोणा-कोणाला मिळणार डच्चू

भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदेसेनेच्या काही माजी मंत्र्यांना फडणवीस यांच्या सरकारमधून डच्चू मिळणार आहे. या शपथविधी सोहळ्यात अर्धे नवे मंत्री शपथ घेणार असल्याचे समजते. भाजपचे रविंद्र चव्हाण, गिरीष महाजन, शिंदेसेनेत अब्दुल सत्तार, दिपक केसरकर, तानाजी सावंत यांच्यासह काही मंत्र्यांना वगळण्यात येणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. वगळण्यात आलेल्यांना पक्ष संघटनेत जबाबदारी दिली जाणार आहे.

### भाजपचे संभाव्य मंत्री?

चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, गिरीष महाजन, पंकजा मुंडे, आशिष शेलार, अतुल सावे, सुधीर मुनगंटीवार, संभाजी पाटील निलंगेकर, सुरेश धस, बबनराव लोणीकर, नितेश राणे, गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, राहुल नार्वेकर, मेघना बोर्डीकर, शिवेंद्रराजे भोसले, गोपीचंद पडळकर, माधुरी मिसाळ, राधाकृष्ण विखे पाटील, जयकुमार रावल, डॉ. तुषार राठोड

### राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री?

छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, अदिती तटकरे, नरहरी झिरवाळ, संजय बनसोडे, दत्तामामा भरणे, संग्राम जगताप

### शिंदेसेनेच्या यांचा होणार शपथविधी?

दादा भुसे, उदय सामंत, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील विजय शिवतारे, संजय सिरसाट, अर्जून खोतकर, भरत गोगावले, प्रताप सरनाईक, सुहास कायंदे, राजेश क्षीरसागर, योगेश कदम

### मराठवाड्यातून ६ जणांची लागणार वर्णी

एकनाथ शिंदे मंत्रीमंडळात बीडमधून धनंजय मुंडे, संभाजीनगरमधून अतुल सावे, अब्दुल सत्तार, संदिपान भुमरे, तानाजी सावंत यांचा समावेश होता. आता देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रीमंडळात भाजपकडून बीडमधून पंकजा मुंडे, संभाजीनगरमधून अतुल सावे, लातुरमधून संभाजी पाटील निलंगेकर, जालना येथून बबनराव लोणीकर यांची तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून बीडमधून धनंजय मुंडे तर शिंदेसेनेतर्फे संभाजीनगरमधून संजय सिरसाट हे आमदार मंत्री पदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातून जवळपास ६ जणांना फडणवीस संधी देऊ शकतात, असे दिसते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ०.५० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड : १८.०० क्विंटल | १,९८१ | २,४०० | २,१५० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ८.०० क्विंटल | ५,००० | ६,८०१ | ६,१३७ |
| उडीद : ४.०० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| बाजरी: २१.०० क्विंटल | २,०४१ | ४,३३० | ३,५११ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| सोयाबीन: ३७.५० क्विंटल | ३,९६६ | ४,०२० | ३,९९१ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |

# धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदात संभाजीराजेंचा खोडा?

## वाल्मिक कराड खुला फिरतोय; नाव न घेता धनंजय मुंडेंवर हल्लाबोल

बीड- खंडणीचा गुन्हा दाखल असताना वाल्मिक कराडा अजूनही खुला फिरतोय, जोपर्यंत सरपंच संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांना न्याय मिळत नाही तोपर्यंत अजित पवारांनी इथल्या आमदारांना मंत्री करू नये अशी मागणी संभाजीराजेंनी केली. संभाजीराजेंनी नाव न घेता धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल चढवत त्यांना मंत्री करु नये, असे सांगितल्याने आता धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदात संभाजीराजेंचा खोडा असल्याचे दिसत आहे. काही दिवसांपूर्वी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. त्यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वनासाठी संभाजीराजे बीडमध्ये आले होते.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे पडसाद राज्यभर उमटले असून वातावरण तणावाचे आहे. अनेक राजकीय नेते मस्साजोग येथे जावून देशमुख कुटुंबाची सांत्वनपर भेट घेत आहेत. संभाजीराजे यांनी सुध्दा शनिवारी तेथे जावून देशमुख कुटुंबियांना धीर देण्याचे काम केले. यावेळी बोलताना संभाजीराजे म्हणाले, कुणावर तरी अन्याय होत असल्याने त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या संरपंच संतोष देशमुखांची क्रूर हत्या केली जाते. ज्या प्रकारे ही हत्या करण्यात आली त्यावरून महाराष्ट्र हा बिहारच्या मार्गावर चाललाय का असा प्रश्न माजी खासदार संभाजीराजे यांनी व्यक्त पान २ वर





### नेमकं काय म्हणाले संभाजीराजे छत्रपती?

या प्रकरणात पीआयला देखील सह आरोपी करा अशी मागणी यावेळी संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. माजी मंत्र्यांनी या प्रकरणात लक्ष घालायला हवे होते. आम्ही कुणालाही सोडणार नाही. मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की या प्रकरणात जातीने लक्ष घाला. माझी अजितदादांना विनंती आहे की, या गुन्ह्यात तुमच्या पक्षाचे लोक आहेत, त्यामुळे जोपर्यंत न्याय मिळत नाही. तोपर्यंत या मतदारसंघातील आमदाराला मंत्री करू नका, ही माझीच नाही तर येथील सगळ्या ग्रामस्थांची देखील भूमिका आहे. या प्रकरणाची एसआयटी चौकशी करावी आणि त्यामध्ये जिल्ह्यातील एकही अधिकारी नसावा अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली.

# राज्यातला गारठा कायम राहणार

## किमान तापमानात वाढ होण्याचा अंदाज तर अवकाळीचीही शक्यता

पुणे । प्रतिनिधी

राज्यात थंडीचा कडाका वाढला आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये तापमान वाढल्यामुळे त्याचा परिणाम राज्यातही दिसून येत आहे. आणखी काही दिवस राज्यातला गारठा कायम राहणार आहे. मात्र किमान तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे काही ठिकाणी अवकाळी पावसाचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दक्षिण अंदमान समुद्रात चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार होऊ लागली असून, सोमवारपर्यंत या भागात कमी दाब क्षेत्राची निर्मिती होण्याची शक्यता आहे. यातच पश्चिमी चक्रावात आणि पश्चिमेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढला आहे. राज्यात मात्र गारठा कायम असला तरी किमान तापमानात हळहळू वाढ होत आहे. दोन दिवसांत किमान तापमानात हळूहळू २-३ अंशाची वाढ होण्याची शक्यता आहे.

### उष्णता आणि पाऊस सोबतच

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात पुन्हा ढगाळ वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. सांगली, सोलापूर, धाराशिव या जिल्ह्यांत ढगाळ वातावरण जास्त काळ राहू शकते. त्यामुळे रविवारपासून पुढील पाच दिवस राज्यातील तापमानात वाढ होऊ शकते. त्यामुळे ऐन डिसेंबरमध्ये नागरिकांना पाऊस आणि उष्णता या दोन्हींचा सामना करावा लागू शकतो.

cmyk

अग्रलेख

# राष्ट्रवादीचे एकीकरण अशक्यच्या गटात मोडत नाही

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजितदादादा पवार यांच्यातील कौटुंबिक भेट चर्चेच्या केंद्रस्थानी असतानाच शरद पवार गटाचे बडे नेते व भाजपाच्या केंद्रीय नेत्यांमध्ये दिल्लीत खलबते झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या राजकारणात पुन्हा नवे समीकरण जन्माला येण्याची चिन्हे दिसून येऊ लागली आहेत.

लोकसभा निवडणुकीत भरवशाच्या महाराष्ट्रातच मोदी सरकारची मोठी पीछेहाट झाली. ४८ पैकी केवळ १७ जागांवर महायुतीला समाधान मानावे लागले. तर महाविकास आघाडीने ३० जागा पटकावल्या. या सगळ्यात उठून दिसले, ते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे यश. पवारांची तुतारी चांगलीच वाजली. केवळ दहा जागा लढवून पवारांनी ८ जागा जिंकल्या. तथापि, हा ट्रेंड विधानसभेत बदलला. तरीही शरद पवार आता संपले, असे म्हणण्याचे धाडस कुणी केले नाही. मारकडवाडीत गोपीचंद पडळकर, सदाभाऊ खोत आदी मंडळींनी पवारांवर जरूर टीकेचे प्रहार केले. मात्र, त्यांच्या या टीकेबद्दल राष्ट्रवादी अजितदादा गटाबरोबरच अगदी भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांकडूनही नापसंती व्यक्त केली गेली. यातच सारे आले. अजितदादा गटाच्या नेत्यांनी तर भाजपच्या या बोलंदाज नेत्यांना सांभाळून बोलण्याचा सल्ला दिला असून, त्यातला अर्थ समजून घेतला पाहिजे.

१२ डिसेंबर हा शरद पवार यांचा जन्मदिवस. या दिवशी पवारांवर शुभेच्छांचा वर्षाव होणे, हा दरवर्षीचा नित्यनेम. हेच औचित्य साधून अजितदादा पवार, त्यांचे कुटुंबीय आणि दादा गटाच्या इतर नेत्यांनी त्यांची भेट घेणेही स्वाभाविकच. परंतु, सध्याच्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीने राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना वेग आल्याचे दिसते. खरंतर राष्ट्रवादीमध्ये फूट पडून आता बराच काळ लोटला आहे. यादरम्यान लोकसभा आणि विधानसभेच्या दोन महत्त्वाच्या निवडणुकाही पार पडल्या. परंतु, अजूनही राष्ट्रवादीत खरोखरच फूट पडली की ही पवारांची खेळी आहे, याबाबत लोकमनात साशंकता दिसते. त्यामुळे काका आणि पुतण्यांच्या भेटीनंतर राष्ट्रवादीच्या एकीकरणाची शक्यता व्यक्त होत असेल, तर ती अविश्वसनीय ठरू नये. मागच्या काही दिवसांतील राजकीय परिस्थिती पाहिली, तर दादा गटाचे नेते साहेबांविरोधात आणि शरद पवार गटाचे नेते अजितदादांविरोधात फारसे बोलताना दिसत नाहीत. उलट राष्ट्रवादीच्या दोन्ही गटातला संवाद वाढत चालल्याचे दिसते. हे बघता साहेब आणि दादा पुढच्या टप्प्यात एकत्र येऊ शकतात, असे म्हणायला जागा आहे. लोकसभेत दादा गटाची केवळ एकच जागा आहे. शरद पवार गटाच्या आठ जागांचा यात समावेश झाला, तर या जागांची बेरीज नऊवर जाईल. तर विधानसभेतील एकत्रित सदस्यसंख्या ५१ पर्यंत पोहोचेल. त्यामुळे दोन्ही पवार गट एकत्र येऊन राज्यात आणि केंद्रात आपली ताकद वाढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. वास्तविक शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांचे संबंधही अतिशय चांगले आहेत. शरद पवारांचे बोट धरूनच आपण राजकारणात आल्याचे सांगणे ते केंद्रीय कृषिमंत्री असताना त्यांनी केलेल्या मदतीचा उल्लेख करणे, यामध्ये मोदी यांनी कधीही आडपडदा ठेवलेला नाही. पवारांचेही तेच. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शरद पवार यांनी भाजपला बाहेरून पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानंतर सेना आणि भाजप युतीचे सरकार सत्तेवर आले. मात्र, सेनेची बार्गेनिंग पॉवर कमी झाली. ती पवारांमुळे. सहा महिन्यांपूर्वी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर एनडीएचे सरकार सत्तेवर आले. मात्र, पूर्वीसारखे निर्विवाद बहुमत भाजपाकडे दिसत नाही. उलट चंद्राबाबू, नितीशकुमार यांच्या पक्षांच्या कुबड्यांवर या सरकारला अवलंबून राहावे लागत आहे. अशातच उद्योगपती गौतम अदानी यांच्या दिल्लीतील निवासस्थानी शरद पवार गटाचा बडा नेता आणि भाजपच्या केंद्रीय नेत्याची बैठक पार पडल्याचे समोर आल्याने भुवया उंचावणे स्वाभाविकच. तसे अदानींशी शरद पवार यांचे घनिष्ठ संबंध राहिले आहेत. त्यामुळे अदानी हा पवार आणि भाजपाला जोडणारा प्रमुख धागा मानला जातो. या माध्यमातून राष्ट्रवादी शरद पवार गट हा भाजपासोबत जाण्याच्या शक्यता व्यक्त होत असतील, तर त्या कल्पनारम्य मानता येणार नाहीत. याकामी अजितदादांचीही मदत घेण्याचा प्रयत्न असू शकतो. मुळात दोन राष्ट्रवादींचे एकीकरण आणि भाजपाशी समझोता, अशा गोष्टी जुळून आल्या तर महाशक्तीची ताकद आणखी वाढण्यास मदत होऊ शकते. तसे पाहिल्यास मागच्या काही दिवसांपासून भाजपाविरोधात दबावाचे राजकारण करणाऱ्या शिंदे गटालाही शह देता येऊ शकतो. लोकसभेत शिंदे गटाने सात जागा मिळवल्या आहेत. या ७ खासदारांच्या माध्यमातून केंद्रात भाजपावर दबाव टाकण्याचा प्रयत्न शिंदे करत असतात. त्यामुळे खातेवाटपही वेळेत होऊ शकले नाही. मात्र, पवार काका पुतण्यांना सोबत घेतले, तर शिंदेंचे महत्त्व आपोआपच कमी करता येईल, अशी भाजपाची रणनीती दिसते. भाजपच्या राजकारणाचा विचार केला, तर त्यांचा क्रमांक एकचा शत्रू हा काँग्रेसच आहे. तर पवारांच्या नेतृत्वाखालील पुलोद सरकारमध्येही सहभागी जनसंघ होताच. हे पाहता काँग्रेसला दाबण्यासाठी नवे समीकरण जुळले, तरी आश्चर्याचे कारण नसेल.

# निवडणुका बॅलेट पेपर वर घ्या - खा.रजनीताई पाटील

## काँग्रेस आगामी निवडणुका स्वबळावर लढणार

केज । प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुका नुकत्याच संपल्या व या निवडणुकीचे निकाल अनपेक्षित आल्याने निवडणुका खरच लोकशाही पद्धतीने होत आहेत का ? असा प्रश्न काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई पाटील यांनी बोलताना विचारला. केज येथे आयोजित करण्यात आलेल्या इव्हीएम हटाव स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी मंत्री अशोक पाटील हे होते.**




ईव्हीएम हटाओ देश बचाओ, संविधान बचाओ हे अभियान भारतीय काँग्रेस पक्षाने सुरू केले असून या अभियानाची सुरुवात बीड जिल्हयात करण्यात आली याचा शुभारंभ केज येथे करण्यात आला बोलताना खा. रजनीताई पाटील यांनी सांगितले की देशात व विशेषतः महाराष्ट्रात महायुतीच्या विरोधात जनतेचा कौल होता, जनभावना विरोधात होती अनेक पोल देखील महायुतीच्या विरुद्ध होते तरीही यापूर्वी कधीही मिळाल्या नाही येवढ्या मोठ्या प्रमाणात जागा भाजप व मित्र पक्षाच्या येतात याचा अर्थ इव्हीएम्? मध्ये काहीतरी गडबड आहे आणि म्हणून काँग्रेस पक्षाने हे अभियान सुरू केले आहे. येणारा काळ काँग्रेस पक्षचा आहे त्यामुळे सर्वसामान्य लोकांसाठी कामे करा यापुढच्या निवडणुका आता आपल्या कार्यकर्त्यांसह व त्यांच्यासाठीच लढायच्या आहेत प्रत्येक वेळी आपल्यावर जागा वाटपात अन्याय होतो मात्र आता आपण आपल्याच चिन्हावर या निवडणुका लढणार असल्याचे रजनीताई पाटील यांनी सांगितले.

### अब मैं मैदान मे आऊंगा –अशोक पाटील

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अशोक पाटील यांनी आपल्या खास शैलीतून पदाधिकारी व कार्यर्कत्यांना कामाला लागण्याच्या सूचना केल्या आणि आता जिल्ह्यातील प्रत्येक निवडणूक काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार आहे त्यामुळे मी आपल्या कार्यकर्त्यांसाठी सैदव उपलब्ध असेल मला कधीही कुठेही बोलवा मी यायला तयार आहे. मोठ्या ताकतीने पक्ष संघटन करू आणि तेवढ्याच ताकतीने नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आपण काँग्रेसच्या चिन्हावर लढू अस मत त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी देखील या अभियानाची सुरुवात खा.रजनीताई पाटील यांच्या स्वाक्षरीने सुरुवात करून केली तर यापुढे प्रत्येक तालुका निहाय पक्ष बांधणी करून नव्या जुण्यांचा एकत्र येवून मोठ बांधून जिल्ह्यात पक्षाला पुन्हा शिखरावर नेण्याचे काम आपण सर्वजण करू अशी भावना व्यक्त केली.

यावेळी या कार्यक्रमाला आदित्य पाटील, नवनाथ थोटे, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष मीनाक्षी पांडुळे, अनुसूचित जाती सेल चे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, सर्व तालुका अध्यक्ष, युवक चे पदाधिकारी, महिला पदाधिकारी, अल्पसंख्यांक विभागाचे पदाधिकारी, अनुसूचित जाती सेल चे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी यांचे सह प्रमुख कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# नागपूरमध्ये मुख्यमंत्री फडणवीसांच्या स्वागताची जय्यत तयारी



## आज नागपुरात होणार दाखल, महारॅलीचे आयोजन

नागपूर । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्याने नागपूरमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. शपथग्रहण सोहळ्यानंतर प्रथमच रविवारी (दि.१५) ते नागपुरात येत आहेत. यापूर्वी दोनदा त्यांचा नागपूर आगमनाचा मुहूर्त लांबणीवर पडला. सोमवारपासून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरू होत असताना फडणवीस यांच्या स्वागतासाठी नागपूर सजले असून ठिकठिकाणी झेंडे, भगव्या पताका लावून कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली आहे. ठिकठिकाणी रांगोळ्या काढल्या जात असून धरमपेठ त्रिकोणी पार्क या फडणवीस यांचे निवासस्थान परिसरात जणू या निमित्ताने देव दिवाळी साजरी होणार आहे. घराघरावर विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे.

हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित दादा पवार यांच्या स्वागतासाठी समर्थकांनी मोठमोठे कटआउट लावले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विमानतळ परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करतील. यानंतर विमानतळ चौकातील प.पू. हेडगेवार स्मारकस्थळी वंदन करतील. वर्धा मार्गावरून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निवासस्थानापर्यंत स्वागताची भव्य महारॅली काढण्यात येणार आहे. प.पू. हेडगेवार स्मारक स्थळापासून रॅलीला सुरुवात होईल. सोमलवाडा चौक, राजीव नगर चौक, रेडिसन ब्ल्यू हॉटेल चौक, छत्रपती चौक येथून डावीकडे खामला चौक येथून उजवीकडे तात्या टोपे चौक, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर चौक, बजाजनगर चौक, शंकरनगर चौक मार्गाने लक्ष्मीभुवन चौक येथे रॅली येईल. लक्ष्मीभुवन चौकामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जनतेला संबोधित करणार आहेत. यानंतर कारने निघून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी रॅलीची सांगता होईल.

पान १ वरून...

### शेतकऱ्यांवर पाण्यासह

हरियाणा पोलिसांनी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. तसेच शंभू सीमेवरील गावांमधील इंटरनेट सेवा बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते. हा आदेश १७ डिसेंबरपर्यंत लागू राहणार होता. पण आता यात एक दिवसांची वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, शंभू सीमेवर पोलिसांनी केलेल्या दबावतंत्रात शेतकरी जखमी झाले आहेत, यामुळे एसकेएमने १०१ शेतकऱ्यांचा गट मागे बोलावला आहे. आता शेतकरी किसान मजदूर मोर्चा आणि एसकेएम पुन्हा बैठक घेणार असून आंदोलनाची नवी दिशा ठरवणार आहेत.

**१७ शेतकरी गंभीर जखमी**

शंभू सीमेवर पोलिसांचे बॅरिकेड्स तोडून पुढे जाण्याच्या प्रयत्नात १७ शेतकरी गंभीर जखमी झाले आहेत. शंभू सीमेवर पोलिसांनी शेतकऱ्यांवर रॉकेट लाँचर डागले असून रबरी गोळ्या झाडल्या आहेत. तसेच पोलिस शेतकऱ्यांवर २०० मीटरपर्यंत घग्गर नदीतील दुर्गंधीयुक्त पाण्याचा मारा करत असल्याचा आरोप आंदोलक शेतकऱ्यांनी केला आहे. यावेळी या आंदोलनात शेतकऱ्यांमध्ये काँग्रेस नेते आणि कुस्तीपटू बजरंग पुनियाही सामील झाले होते.

### धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदात

केला. खंडणी प्रकरणात ज्याच्यावर गुन्हा दाखल आहे तो वाल्मिक कराड अजूनही खुला फिरतोय, तर आरोपी सुदर्शन घुले फरार आहे अशा शब्दात संभाजीराजेंनी आपला संताप व्यक्त केला. यावेळी त्यांनी पोलीस तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत जोरदार हल्लाबोल केला आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देखील मोठी मागणी केली आहे. जोपर्यंत देशमुख कुटुंबियांना न्याय मिळत नाही तोपर्यंत इथल्या आमदारांना मंत्री करु नका, अशी मागणी त्यांनी अजितदादांकडे केली. यावेळी संभाजीराजेंचा इशारा हा धनंजय मुंडे यांच्याकडे असल्याने आता मुंडेंच्या मंत्रिपदात संभाजीराजेंचा खोडा असल्याचे दिसत आहे. तसेच आ. सुरेश धस यांनी सुध्दा अप्रत्यक्षरित्या मुंडे यांच्याकडेच बोट दाखवले आहे. त्यामुळे धनंजय मुंडेंचा मंत्रिमंडळात समावेश करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित दादांना बीडमधील परिस्थितीचा सुध्दा विचार करावा लागणार असल्याचे बोलले जात आहे.

### काँग्रेसच्या कपाळावरचे आणीबाणीचे

केली. आणीबाणीच्या दिवसांचीही आठवण मोदींनी काढली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताची लोकशाही आणि भारताचा इतिहास अत्यंत समृद्ध होता. जगासाठी भारताचा इतिहास प्रेरणादायी आहे. त्यामुळेच आज भारताला मदर ऑफ डेमोक्रसी म्हणून ओळखले जाते. जगामध्ये महिलांना संधी देण्यासाठी अनेक दशकं लोटली. परंतु आपल्याकडे संविधानाने सुरुवातीलाच महिलांना त्यांचे हक्क देऊ केले. आपणही याच सभागृहात नारी शक्ती बिल मंजूर करुन महिलांना न्याय दिला आहे. मोदी पुढे म्हणाले की, जेव्हा संविधानाला पन्नास वर्षे झाले. तेव्हा अटलबिहारी वाजपेयींचे सरकार होते. २६ नोव्हेंबरला देशभरात संविधानाचे पन्नासावे वर्षे साजरे केले. अटल बिहारी वाजपेयींनी पंतप्रधानांच्या नात्याने एकतेचा संदेश दिला होता. जेव्हा देश संविधानाचे पन्नासावे वर्षे साजरे करत होता. तेव्हा मलाही संविधानाच्या प्रक्रियेतून मुख्यमंत्री होता आले. संविधानाला ६० वर्षे झाल्यानंतर आम्ही गुजरातमध्ये ते वर्ष साजरे केले. तेव्हा आम्ही संविधान ग्रंथाची हत्तीच्या अंबारीवरुन मिरवणूक काढली. राज्याचा मुख्यमंत्री संविधानाच्या खाली, हत्तीच्या बाजूला रस्त्यावरुन चालत होता. देशाला संविधानाचे महत्त्व कळावे, यासाठी प्रयत्न करत होता. हे सौभाग्य मला मिळाले, असे ते म्हणाले.

पान ६ वरून...

### शासकीय अधिकाऱ्यांनी कामाबाबत

प्रमुखांच्या विकास आढावा बैठकीमध्ये दिल्या

या बैठकीसाठी उपविभागीय अधिकारी नसीमा शेख यांच्यासह आष्टी, पाटोदा,आणि शिरूर का.येथील तहसीलदार, गटविकास अधिकारी, दुय्यम निबंधक, पोलीस निरीक्षक, गटशिक्षण अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पाटबंधारे, बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा, पाटबंधारे, या विभागांचे उप अभियंता आणि इतर सर्व खाते प्रमुख उपस्थित होते पुढे बोलताना..आ.सुरेश धस म्हणाले की,

आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव हा माझा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये वरदान ठरणारा प्रकल्प आहे गेल्या दहा वर्षांमध्ये आवश्यक त्या गतीने कामे झाली नाहीत ती आता तातडीने पूर्ण करावयाची आहेत पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील असलेले सिंदफणा मध्यम प्रकल्प, उखळवाडी कारेगाव पांगरी जाधववाडी या तलावांची उंची वाढवण्याचे काम २०१४ पासून रखडलेले आहे ही कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले संयुक्त मोजणी आणि इतर कामे संबंधिताने तातडीने करावीत. पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनाची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे असंतोष आहे या कामी तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे सांगून शिरूर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये मोठा घोटाळा असून त्याची चौकशी करून या भ्रष्टाचारामध्ये सहभागी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करणार असल्याचे त्यांनी सांगितले आष्टी तालुक्यातील ठोंबळ सांगवी आणि गहूखेल येथील प्रकल्पाचेही काम २० १४ पासून रखडलेले आहे या प्रकल्पांचे संयुक्त मोजणी अहवालाचे गावामध्ये जाहीर वाचन करण्यात यावे

गोरगरीब शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे पैसे लवकर मिळतील याकडे लक्ष द्यावे आष्टी तालुक्यातील ४६ किलोमीटर अंतराच्या गावांमधून जाणारा सुरत चेन्नई या राष्ट्रीय महामार्गावरील १९ गावांमधील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाबाबत तक्रारी प्राप्त आहेत त्याची देखील शहानिशा करून या रस्ता कामाच्या संयुक्त मोजणी अहवालाची चौकशी करण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली शासनाच्या विकास कामांमध्ये स्वार्थासाठी आड येणाऱ्या कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करून वेळप्रसंगी गुन्हे दाखल करावेत असे सांगितले..

सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छता ठेवावी खाते प्रमुखांनी याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये सिजेरियन मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्यामुळे गोरगरीब सर्वसामान्य रुग्णांना त्याचा लाभ मिळाला होता परंतु अलीकडच्या काळामध्ये हे प्रमाण कमी झाल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अंतर्गत असलेल्या जलजीवन योजनेअंतर्गत सर्वात जास्त योजना आष्टी मतदार संघात असून अधिकाऱ्यांनी या सर्व योजना दर्जेदार करून नळाद्वारे नागरिकांना पाणी मिळावे ज्या कामांमध्ये हलगर्जीपणा झाला आहे ते काम पूर्ण करून घ्यावे निधीची काळजी करू नका मी निधीची व्यवस्था करतो तुम्ही मात्र कामे चांगल्या पद्धतीने पूर्ण करा अशा सूचना दिल्या आष्टी येथील खाजगी कोचिंग क्लासेस आणि कन्या शाळा परिसरातील रोड रोमि यांचा बंदोबस्त करण्यात यावा यासाठी दामिनी पथक तयार करून प्रभावी पद्धतीने या रोड रोमिओ वर कारवाई करावी असे सांगून आपल्या हद्दीतील हातभट्टी ताडी अमली पदार्थ विक्री होऊ नये यासाठी कठोर कारवाई करण्याचे सांगितले सध्या शेतकऱ्यांचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पुरेसा दाबाने वीज उपलब्ध होत नसल्याने वीज वितरण विभागाने तातडीने सर्वेक्षण करून किती ट्रान्सफॉर्मर्स लागतील

पान ६ वरून...

याची माहिती द्यावी शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने आणि नियमित वीज उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

### स्व.संतोष देशमुख यांच्या

कंपनीच्या माध्यामातून राजकीय अकसातून लावण्यात आलेला खंडणीचा खोटा गुन्हा रद्द करण्यात यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली असून, याबाबत तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही महायुतीच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, रिपाइंचे नेते सचिन कागदे, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, भाजप युवा मोर्चाचे निळकंठ चाटे, शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे त्याचबरोबर सूर्यभान नाना मुंडे, प्रा.पवन मुंडे, दीपक नाना देशमुख, सुनील नाना फड, सुरेश अण्णा टाक, जयपाल लाहोटी, शरद भाऊ मुंडे, शकील भाई कुरेशी, अजीज भाई, सिराज भाई, रवींद्र परदेशी, सोफियाताई नंबरदार, युवतीच्या तालुकाध्यक्ष प्रा.शिल्पाताई मुंडे, वैशाली ताई तिडके, सुलभा साळवे, अर्चनाताई रोडे यांसह आदी उपस्थित होते.

### दत्तजयंती उत्साहात

इर्ले यांनी प्रवचन केले प्रा.डॉ. दिगंबर मुडेगांवकर यांनी सर्वज्ञ दासोपंताच्या ग्रंथावर विवेचन केले कपिल गणेश मंडळाचे भजन शैलेष पुराणिक यांचे गायन हे देखील कार्यक्रम झाले अनेक वर्षाची परंपरा लाभलेल्या तसेच सांस्कृतिक व कलात्मक दृष्टीने महत्वपुर्ण असलेल्या दत्त जयंती मार्गशिर्ष नवरात्र महोत्सवातील प्रवचनात दत्तभक्ती आणि परंपरा विषद केली.

दत्त जयंती नवरात्र महोत्सवा निमित्त सकाळी जयंती, मंत्र अनुष्ठान, वेदोक्त श्लोक, प्रदक्षिणा, महानिरंजन, अभिषेक, स्त्रोत्र, अष्टके, दासोपंत रचित भजन उत्साहात झाले सर्वज्ञ दासोपंत यांच्या साहित्याच्या अनुषंगाने उत्सवात प्रबोधन झाले सायंकाळी व रात्रो मंदिर परिसरात पालखी सोहळ्याचे वैशिष्ट्यपूर्ण आयोजन पत्रकार राहुल देशपांडे यांच्या नियोजनाखाली सुरेख झाले सायंकाळी गुरूपुजन, अवतारोत्सव, दत्त जयंती निमित्ताने धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले या महोत्सवात महिला, पुरुष,दत्तभक्तगणांचा मोठा प्रतिसाद लाभला.

### आज ११ व्या अंबाजोगाई

करण्यात आला आहे. या परिसंवादात अमृत महाजन, प्रा. शैलजा बरुरे, श्री किशन काळे आणि अमर हबीब हे सहभाग नोंदवणार आहेत. या परिसंवादाचे अध्यक्ष ही अमर हबीब हे असणार आहेत. या परिसंवादाचे सूत्रसंचालन प्रा. रमेश सोनवळकर हे करणार आहेत.

दुपारी ३ ते ४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या सत्रात कथाकथन होणार आहे. या कार्यक्रमात योगेश्वरी विद्यालयातील विद्यार्थी ऋतुराज केंद्रे आणि वेणुताई चव्हाण विद्यालयातील विद्यार्थीनी गौरी कांबळे हे सहभाग घेणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी मंगल भुसा या असणार आहेत तर सुत्रसंचलन प्रा. रवी पाठक हे करणार आहेत. सायंकाळी ४ वाजता या दोन दिवसीय संमेलनाचा समारोप सायंकाळी ४ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संमेलनाचे अध्यक्ष बालाजी सुतार हे असणार आहेत तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून पुणे येथील प्रसिद्ध दंत चिकित्सक डॉ. आदित्य पतकराव, मसाप अध्यक्ष दगडू लोमटे, सचीव गोरख शेंद्रे, स्वागत समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांचा मसापच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील

पान ६ वरून...

बक्षीस वितरण तसेच संमेलनाच्या यशस्वीतेसाठी झटणाऱ्या हातांचा सत्कार करण्यात येणार आहे. या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी संमेलनात आयोजित करण्यात आलेल्या सर्व उपक्रमात शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन सहकार्य करावे असे आवाहन स्वागत समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, सचीव प्रा. पंडीत कराड, उपाध्यक्ष सुभाष बाहेती, मसाप शाखा अंबाजोगाई चे मार्गदर्शक अमर हबीब, अध्यक्ष दगडू लोमटे, सचीव गोरख शेंद्रे व स्वागत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### पिकावर घाटेअळीचा

सापळे प्रति हेक्टरी जमिनीपासून १ मीटर उंचीवर लावावेत. कामगंध सापळयामध्ये ८ ते १० पतंग प्रति सापळा सतत २ ते ३ दिवस आढळल्यास किडनाशकाची फवारणी करावी. शेतामध्ये पक्षी बसण्यासाठी पिकाच्या किमान एक ते दोन फूट उंचीवर पक्षी थांबे हेक्टरी ५० ते ६० ठिकाणी उभारावेत. यामुळे पक्ष्यांना अळ्यांचे भक्षण करणे सोपे जाईल.

सुरक्षा साधने वापरा

शेतात कीडनाशकाचे द्रावण तयार करताना व फवारणी करताना चष्मा, हातमोजे व तोंडावर मास्कचा व सुरक्षा किटचा वापर करावा. शेतकऱ्यांनी फवारणी करताना योग्य ती काळजी घ्यावी म्हणजे किटकनाशकचा शरीरावर प्रादुर्भाव होणार नाही.

शिवप्रसाद येळकर- तंत्रज्ञान समन्वयक कृषी विभाग

लहान अवस्थेत असताना हे करा पिकाच्या सुरुवातीच्या काळात ५ टक्के निंबोळी अकांची किंवा अझाडिरॅक्टिन ३०० पीपीम ५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून प्रतिबंधात्मक फवारणी करावी. घाटेअळी लहान अवस्थेत असताना एचएएनपीव्ही (५०० एल ई) १ मिली प्रति लिटर पाण्यात ५ ग्रॅम निळ टाकुन सायंकाळी फवारणी करावी.

अधिक प्रादुर्भाव झाल्यास हे उपाय : किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर आढळून आल्यास इमामेक्टीन बेन्झोएट (५ एसजी) ४.४ ग्रॅम किंवा फ्ल्युबेन्डामाईड (३९.३५ एससी) २ मिली किंवा क्लोरअॅन्ट्रानीलीप्रोल (१८.५ एससी) २.५ मिली यापैकी एका कीडनाशकाची प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कीडनाशकाचे प्रमाण नॅपसॅक पंपासाठी असून पेट्रोल पंपासाठी मात्रा तीनपट वापरावी. असेही शेतकऱ्यांना सुचविले आहे.



नवी दिल्ली येथे केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयातील सहसचिव मा. नवलकीशोर राम यांची भेट घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी देशातील पहिल्या दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेची माहिती पुस्तिका भेट देऊन वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपये सूट देण्यात यावी याबाबत सविस्तर चर्चा केली.

cmyk

## अज्ञात वाहनाने कारला पाठीमागून ठोकले, दोन जखमी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अज्ञात वाहनाने कारला पाठमागून जोरात ठोकल्याने दोघे जखमी झाल्याची घटना पाण्याची टाकी ते अंबा साखर कारखाना या रस्त्यावरअसलेल्या पोद्दार इंग्लीश स्कुल जवळ शनिवारी (दि. १३) रात्री अकरा वाजणाच्या सुमारास घडली. यात कारचे प्रचंड नुकसान झाले असून अज्ञात वाहन कारला ठोकून पळून गेले आहे.पाण्याची टाकी ते अंबा साखर कारखान या रस्त्यावर असलेल्या पोद्दार शाळे जवळ गतीरोधक बसवीण्यात आले आहेत. या रस्त्यावरील गतीरोधक चुकवण्यासाठी वाहन चालक विरुद्ध बाजूच्या रस्त्यावरुन जातात. शनिवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास अंबा साखर कारखाना या रस्त्यावरुन टाटा नेक्सान कार (एम एच ४४ एस ६६४५) येत होती. ही कार पोद्दार शाळे जवळ आली असता कार चालकांना समोरील गतीरोधक पाहून जोराचे ब्रेक लावले. यावेळी पाठमागून येणाऱ्या भरधाव वाहनाने ब्रेक न लावण्याने हे वाहन जोरात जाऊन कारच्या पाठीमागच्या बाजूला आदळले. यात कारचे नुकसान झाले तर पाठीमागच्या सीटवर बसलेली व्यक्ती व चालक गंभीर जखमी झाले आहेत. कारला पाठी मागून ठोकून अज्ञात वाहन पसार झाले आहे. या प्रकरणी पोलीसात तक्रार दाखल झाली नव्हती.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि.१५ डिसेंबर २०२४


# शेतीतील उत्पादनावर प्रक्रिया करून विकले तर अधिक फायदेशीर होईल -रोहिणी जोशी

### शेती व्यवसायावर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'शेती व्यवसायावर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण' या कार्यक्रमाचे आयोजन १४ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक, व्याख्याता श्रीमती रोहिणी जोशी-भरड (शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, डिगोळ आंबा ) तर अध्यक्षस्थानी शिवदास शिरसाट,उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे,उपप्राचार्य प्रा. एस.एस.औंढे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी शेती व्यवसायावर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाचे अयोज प्रशिक्षण आणि मार्गदर्शन कार्यक्रमामध्ये रोहिणी जोशी यांनी मराठवाड्यातील विविध धान्य, फळे, भाज्या यांची माहिती दिली. तसेच यावरती प्रक्रिया करून विविध माध्यमातून नवीन उत्पादन निर्माण करता येते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी मशरूम,आवळा,ज्वारी,शेवगा तसेच सिताफळ या आपल्या भागात उपलब्ध असलेल्या फळे, भाज्या, धान्य प्रक्रिया करून कशाप्रकारे उत्पन्नाचे साधन निर्माण करता येते.या क्षेत्रात असणाऱ्या विविध संधींची माहिती तसेच व्यवसाय उभा करण्यासाठी लागणाऱ्या विविध प्रमाणपत्रांची, नोंदणी प्रक्रिया यांचीही माहिती दिली.केंद्र शासनातर्फे तसेच राज्य शासनाच्या वतीने विविध ठिकाणी चालवण्यात येणारे प्रशिक्षण कार्यक्रम प्रमाणपत्र अभ्यासक्रमा विषयी सांगीतले.विद्यार्थ्यांना फक्त नोकरीवरतीच अवलंबून न राहता स्वतःचा वेगळा व्यवसाय आपण शेतीतून निघणाऱ्या मालावरती प्रक्रिया करून त्याची आपल्या देशातच नव्हे तर देशाबाहेरही विक्री करता येऊ शकते याविषयी माहिती दिली.शेतकऱ्यांना आपली आर्थिक स्थिती बळकट करावयाची असेल तर आपल्या शेतीतील उत्पन्न जशास तसे न विकता त्यावर प्रक्रिया करून विकले तर अधिक फायदेशीर होईल असे मत प्रमुख मार्गदर्शक, व्याख्याता श्रीमती रोहिणी जोशी-भरड यांनी व्यक्त केले.तरुणांनी स्वतः मधील कौशल्य आणि आवड ओळखून शेती व्यवसायाकडे वळणे ही काळाची गरज आसल्या प्राचार्य आणि या कार्यक्रमाचे संयोजक डॉ. शिवदास शिरसाट म्हणाले.कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. अहिल्या बरुरे यांनी महाविद्यालयात कार्यरत असलेल्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची माहिती दिली.तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने ग्रामीण भागातील असल्याने, शेती विषयाची पार्श्वभूमी असल्याने त्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सामग्रीतून कसा व्यवसाय उभा करता येईल यावर उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, यांनी मार्गदर्शन केले.या वेळी उपप्राचार्य प्रा. एस.एस.औंढे उपस्थित होते. कार्यक्रमास डॉ. दीपक भारती, प्रा. रोहित पाटील प्रा. सुशील आचार्य डॉ. रुपेश देशमुख, डॉ. रोहिणी खंदारे यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, आभार डॉ. मनोरमा पवार यांनी मानले.या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बजरंगबली वेताळ मंदिरात दत्त जयंती उत्साहात साजरी

परळी । प्रतिनिधी

जागृत देवस्थान असलेल्या श्री बजरंगबली वेताळ मंदिरात दत्त जयंती मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रचना करण्यात आली होती, ज्यात काकडाआरती, पूजा, महाआरती, तीर्थ प्रसाद आणि महाप्रसादाचे वितरण समाविष्ट होते. मंदिराच्या सजावटीला विशेष महत्त्व देण्यात आले होते, ज्यामध्ये आकर्षक विद्युत रोषणाई आणि मनमोहक दत्त मंदिराची अलंकरणे होती.दत्त जयंतीचे मुख्य सोहळे महंत श्री विलासानंदजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. महाआरतीला उपस्थित भक्तांच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमला होता. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबर' च्या मंत्रोच्चाराने वातावरण भक्तिपूरण झाले.

शनिवारी भल्या पहाटेपासून मंदिरात भक्तांची वर्दळ पाहायला मिळाली. नामजप, आरती आणि महाप्रसादाच्या आयोजनेसाठी भाविकांची लगबग चालू होती.

या दिवशी विशेष कार्यक्रम म्हणून मराठी भावगीत, भक्तिगीत आणि महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम झाला. श्री गुरुचरित्र पारायण, अभिषेक, आरती, पाळणा, मंत्रपुष्प व जागर यांचे आयोजनही केले गेले. दत्त जयंतीच्या निमित्ताने मंदिरभर हजारो भक्तांनी दर्शन घेतले आणि आशीर्वाद घेतले. दिवसभरातील धार्मिक उत्सवामध्ये अभिषेक, कीर्तन, आणि भक्तिरस यांचा सुरेल संगम झाला. मंदिर परिसर भक्तिभावाने भरलेला होता आणि प्रत्येक भक्ताला दत्ताचा कृपाभार मिळाला. दत्त जयंती उत्सवाच्या दिवशी श्री बजरंगबली वेताळ मंदिराने एकता, भक्ती आणि श्रद्धेचे उत्तम उदाहरण ठेवले.

## थोडक्यात



### आंबेडकर अनुयायींची मुक रॅली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परभणी येथील भारतीय संविधानाची पूनाकृतीची तोडफोड करून विटंबना तसेच केज तालुक्यातील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या. या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ आंबेडकर अनुयायींनी शहरातून शुक्रवारी (दि. १३) मूक रॅली काढली. यावेळी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देत दोन्ही घटनेतील आरोपींवर कडक कार्यवाही करण्याची मागणी केली. परभणी शहरात असलेली भारतीय संविधानाची पूनाकृतीची तोडफोड करून आरोपीने विटंबना केली. या घटनेचे उच्चस्तरीय चौकशी करून दोषीवर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. तसेच मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. या दोन्ही मागणीसाठी अंबाजोगाई शहरात आंबेडकर अनुयायींनी पायी रॅली काढत निषेध नोंदवला. यावेळी नागरिकांनी डोक्याला काळीपट्टी बांधून या दोन्ही घटनेच्या निषेध नोंदवला. या रॅली नंतर मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांना दिले. याप्रसंगी बब्रुवान पोटभरे, दीपक कांबळे, महादेव आदमाने, शैलेश कांबळे, गोविंद मस्के, दशरथ सोनवणे, राणी गायकवाड यांच्यासह शहर व तालुक्यातील आंबेडकर अनुयायींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दिगंबर कुंडलकर यांना राज्यस्तरीय गुणिजन गौरव पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सध्या बीड येथे प्रमाणित लेखापरीक्षक, सहकारी संस्था, बीड या पदावर कार्यरत असलेले श्री. दिगंबर कुंडलकर यांना मुंबई येथील मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी महाराष्ट्र राज्य मुंबईहून राज्यपुरस्कार निवडीचे पत्र नुकतेच प्राप्त झालेले आहे. त्यांना राज्यस्तरीय गुणिजन गौरव आदर्श सहकारी संस्था सेवारत्न पुरस्कार पुणे येथे दि.१८/१२/ २०२४ वार बुधवार रोजी प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप सन्मानचिन्ह, गौरवपदक, मानपत्र, महावस्त्र, मानकरी बॅच आणि मानाचा फेटा असे या पुरस्काराचे स्वरुप असून मान्यवर पाहुण्यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. अध्यात्मीक क्षेत्राचा वडीलोपार्जित वारसा असणारे शांत व संयमी व हसतमुख असणारे श्री. दिगंबर कुंडलकर यांनी या आगोदरच्या काळामध्ये नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये मॅनेजर पदावर २० वर्षे इमाने इतबारे उत्कृष्टरित्या कामकाज सेवा केलेली आहे व गेली १० वर्षापासून प्रमाणित लेखापरीक्षक, सहकारी संस्था, बीड या पदावर सध्या कार्यरत आहेत. सहकारी संस्थेचे गाढे अभ्यासु व्यक्तीमत्व त्यांचे आहे. त्यांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन, कागदपत्राची छाननी करुन व सहकारातील दोन तज्ञाकडून खात्री करुन त्यांना राज्यस्तरीय गुणिजन गौरव आदर्श सहकारी संस्था सेवारत्न पुरस्कार जाहिर झाला आहे. त्याबद्दल त्यांचे गुरुबंधु, मित्र, आप्तेष्ट, नातेवाईक व इतर सर्व स्तरातुन अभिनंदन करण्यात येत आहे.

## बीड जिल्ह्यातील फायनान्स कंपन्यांची 'सावकारी' -दत्ता वाकसे

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात १० हून अधिक वित्त सहाय्य करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्या असून त्यांचे जाळे दिवसेंदिवस घट्ट होत चालले आहेत. अल्प व्याजाच्या नावाखाली महिलांना कर्ज देवून जणु एक प्रकारे सावकारीच सुरू झाली आहे. प्रत्येक कंपन्यांची उलाढाल कोट्यवधीचा घरात पोहोचली आहे. परिणामी आजघडीला बीड जिल्ह्यातील जवळपास ७० टक्के कुटूंबातील महिला कर्जाच्या गळाला लागल्या आहेत. या वाढत्या सावकारीच्या जाळ्याकडे वेळीच लक्ष घालण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रसिडेंट दत्ता वाकसे व्यक्त केली आहे बीड जिल्ह्यात मायक्रो फायनान्स कंपन्यांचे जाळे दिवसेंदिवस घट्ट होत चालले आहेत. महिलांचे गट तयार करणे, गटांना सोयीस्कर पध्दतीने कर्ज उपलब्ध करून देणे व दिलेल्या कर्जाची महिन्यापोटी वसुली करणे हे मायक्रो फायनान्स कंपन्यांची कामे जोमात सुरू आहेत. कर्ज देणे आणि वसुली करणे यासाठी तरूण-तरुणींना कामावर ठेवण्यात आले आहे. जवळपास ५०० हून अधिक तरूण-तरूणींना या मायक्रो फायनान्स कंपनीकडून रोजगार उपलब्ध झाले असले तरी त्या कर्मचाऱ्यांचे वेतन बीड



जिल्ह्यातील महिलांकडून व्याजाच्या स्वरूपात वसुल केले जात आहे. मायक्रो फायनान्सचे हे अर्थसहाय्य सावकारीचे स्वरूप घेत चालले आहे. एखाद्या कर्जदार महिलेने वेळेवर कर्जाचा हप्ता भरला नाही तर तिला अपमानस्पद वागणुकीलाही समोर जावे लागत आहे. अवाजवीय व्याज आकारणी करून वसुली होत असतानाही कर्जाच्या

डोंगराखाली सापडलेल्या महिला या संदर्भात समस्या मांडू शकत नाहीत. प्रत्येक कुटूंब कर्जाच्या डोंगराखाली सापडला आहे.रिजर्व्ह बँकेने खासगी फायनान्स कंपन्यांना नियमावली ठरवून दिली आहे. तरीही अत्यल्प व्याज आकारणी केली जात आहे, असे सांगून त्या आड खासगी कंपन्या मनमानीपणे व्याज आकारून वसुली करीत आहेत. व्याजावर व्याज लावण्याचा धडाका देखील सुरू करण्यात आला आहे. नियमानुसार किती व्याज आकारण्यात आला, हे सांगणे आवश्यक असतानाही कर्ज दिल्यानंतर किंबहुना कर्जदाराकडून अर्जावर स्वाक्षरी घेतल्यानंतर नविन नियम लावले जात आहेत. बहुतांश कंपन्यांकडून प्रत्यक्ष व्यवहार होताना नियम-अटी, शर्ती पाळल्या जात नाहीत, हे वास्तव्य सर्वश्रुत असूनही या प्रकारावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा मात्र डोळ्यावर पट्टी बांधून कंपन्यांच्या सावकारीला खतपाणी घालत आहे. त्यामुळे शासन प्रशासन जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष घालून अशा कंपन्यावर कारवाई करावी अशी मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केले आहे.

## पोलीस असल्याचे सांगत भर दुपारी वयस्क जोडप्यास लुटले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपण पोलिस असल्याची बतावणी करून एका वयस्क जोडप्याच्या अंगावरील तीन तोळे वजनाचे सोने काढून घेतल्याची घटना अंबाजोगाई तालुक्यातील अंबाजोगाई - अहमदपूर महामार्गावरील धायगुडा पिंपळा गावानजीक गुरुवारी (दि.१२) भर दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील साळुंकवाडी येथील मूळ रहिवासी बालाजी केशवराव माने (वय ५५) व त्यांची पत्नी हे दोघे अंबाजोगाईहून गावाकडे साळुंकवाडी येथे गुरुवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास दुचाकी वरून निघाले होते. अंबाजोगाई - अहमदपूर या महामार्गावरील धायगुडे पिंपळा गावा नजीक एका वीट भट्टीच्या समोर खड्ड्याच्या ठिकाणी आरोपीने माने यांची दुचाकी अडवली. मी पोलीस असल्याची बतावणी केली. बनावट पद्धतीने तयार केलेले ओळखपत्रही दाखवले. अंगावर सोन्याचे दागिने ठेवू नका. रस्त्यावर लूटमार सुरू आहे. हातातील अंगठी, गळ्यातील चेन काढून ठेवा असे सांगितले. दरम्यान त्या ठिकाणी आणखी दोन आरोपीचे साथीदार पोचले. माने यांना ही गोष्ट खरी वाटली. भितीपोटी त्यांनी गळ्यातील दोन तोळ्याचे सोन्याचे लॉकेट व हातातली एक तोळ्याची अंगठी काढून रुमालामध्ये ठेवली. काढून ठेवलेले दागिने आरोपीने रुमाला सह पळून नेले व माने यांची फसवणूक केली. याप्रकरणी बालाजी माने यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कर्मचारी अनिल बासर अधिक तपास करत आहेत. दिवसा ढवळ्या महामार्गावर चो-या व फसवणूक करून लूटण्याच्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. धायगुडे पिंपळा गावानजीक महामार्गावर दोन वर्षापासून पुलाचे काम रखडले आहे. याठिकाणी खड्ड्यातून जावे लागते. चोर याचाच फायदा घेऊन वाहनधारकाची अडवणूक करुन लुटमार करतात.

## वाल्मीक कराड यांच्या समर्थनार्थ आज रास्ता रोकोसह शिरूर बंद

शिरूर । प्रतिनिधी

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वाल्मीक कराड यांच्यावर राजकीय दबावापोटी दाखल करण्यात आलेला खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा यासाठी आज जिजामाता चौकात रास्ता रोको करून बंद पाळण्यात येणार आहे.वाल्मीक कराड यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याची कसलीही शहानिशा न करता केवळ राजकीय द्वेशापोटी त्यांना बदनाम करण्याच्या उद्देशाने सदरील गुन्हा दाखल करण्यात आला असून तो मागे घेण्यात यावा यासाठी शहरातील जिजामाता चौकात सकाळी अकरा वाजता रास्ता रोको करण्यात येवून शहर शांततेच्या मार्गाने बंद ठेवण्यात येणार असल्याचे वाल्मीक कराड समर्थक विश्वास नागरगोजे,रवि आघाव,धर्मराज जायभाये, सतिश बडे, महेश




ढाकणे, प्रल्हाद ढाकणे, केशव खेडकर, बबन दहिफळे, भगवान सानप, देविदास जायभाये, सावळेराम जायभाये आदींसह कराड समर्थकांनी निवेदनाद्वारे कळविले आहे.

## संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करणाऱ्याला फाशीची शिक्षा द्या

### भारतीय बौद्ध महासभेची मागणी

बीड । प्रतिनिधी

परभणी येथे दि. १० डिसेंबर रोजी दु.५.३० वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील राष्ट्रीय मानचिन्ह असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करून विटंबना केलेल्या देशद्रोही समाज कंटकाला तात्काळ फासीची शिक्षा देण्यात यावी आणि त्यामागील सुत्रधारी देशद्रोहांची सी.बी.आय. मार्फत तातडीने शोध लावून त्यांच्यावर देशद्रोहाची कारवाई करावी या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांना एका शिष्टमंडळाने भेट घेतली व निवेदन दिले याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे, हनुमंतराव कांबळे, अनिल डोळस, गोपीनाथ बनसोडे, सर्जेराव मस्के, केतन गायकवाड, रमेश सोनवणे , किशोर वडवारे, सुभाष तागडे, महेंद्र वडमारे, प्रभाकर चांदणे, धम्मा पारवेकर, भैय्यासाहेब वाघमारे, भीमराव पायाळ, बबन वडमारे, गणपत डोळस यांच्यासह भारतीय बौद्ध सभेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व




आंबेडकर प्रेमींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

भारतीय राज्यघटना हे भारत देशाचे मानचिन्ह आहे. या राज्यघटनेनुसार भारत देश आज आधुनिक राष्ट्र म्हणून उभे राहताना आणि संपुर्ण जगात भारतीय राज्यघटनेचे गौरव केले जात असताना मराठवाड्यातील जिल्हा परभणी येथे देशद्रोह्यांनी दि.१०/१२/२०२४ रोजी दु.५.३० वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील भारत देशाचे मानचिन्ह असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करून देशद्रोह केली आहे. हा देशद्रोहाचा गुन्हा आहे. त्यामुळे सामाजिक उद्रेक उफाळून येत आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या देशद्रोही घटनेचा सर्वत्र निषेध केला जात आहे. आम्ही या देशद्रोही घटनेचा तीव्र निषेध करतो.समाज कंटकांनी यापुढे असे देशाविरुद्ध देशद्रोह करू नये. देशाच्या सरकारचे, राज्यघटनेचे आणि नागरीकांचे अवमूल्यन करू नये म्हणुन सदरहू देशद्रोहांना तातडीने फाशीची शिक्षा देण्यात यावी. आणि त्यामागील सूत्रधारी समाज कंटाकांचा सी.आय.डी. मार्फत शोध लावून त्यांच्याविरुद्ध देशद्रोहाची कारवाई तातडीने करण्यात यावी. तसेच संपूर्ण देशातील शासकीय कार्यालयासमोर देशाचे मानचिन्ह म्हणून संविधानाची प्रतिकृतीची उभारणी करण्यात यावी आणि त्याचे संरक्षण करून संविधानाचा यथोचित सन्मान राखावा. शासनाची ही कृतीशील भुमिकाच माथेफिरू देशद्रोहांच्या कुकृतीचे चांगले उत्तर ठरेल. अन्यथा यासाठी सामाजिक उद्रेक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारवर राहील.

cmyk




# २० तारखेपर्यंत शेतकऱ्यांनी कांद्याची काढणी करावी

## २१ डिसेंबरपासून अवकाळीची शक्यता, 'या' भागात पावसाचा अंदाज

राज्यातील वातावरणात बदल होत आहे. अनेक भागात कडाक्याची थंडी पाहायला मिळत आहेत. तर काही भागात ढगाळ वातावरण होत आहे. दरम्यान, अशातच हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी हवामानाचा अंदाज वर्तवला आहे. डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पंजाबराव डख यांनी नेमका काय अंदाज वर्तवलाय, त्याबाबतची माहिती पाहुयात.

शेतकऱ्यांनी २० तारखेपर्यंत कांदा काढणी करुन घ्यावी

पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात २१ डिसेंबर ते २५ डिसेंबर पर्यंत भाग बदलत अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळं शेतकऱ्यांनी २० तारखेपर्यंत आपल्या शेतीची कामे पूर्ण करुन घ्यावीत असं आवाहान डख यांनी केलं आहे. ज्या शेतकऱ्यांची कांदा काढणी बाकी असेल त्यांनी २० तारखेपर्यंत कांदा काढणी करुन घ्यावी असंही आवाहन त्यांनी केलं आहे.

कोणत्या भागात अवकाळी पावसाची शक्यता?

२१ ते २६ डिसेंबर दरम्यान मुंबईसह पुणे उत्तर महाराष्ट्र मराठवाडा सहित राज्यातील अनेक भागात अवकाळी पाऊस पडणार आहे. भाग बदलत हा पाऊस पडणार आहे. १९ डिसेंबर पर्यंत राज्यात थंडीची लाट राहणार आहे. २० तारखेनंतर वातावरणात बदल होईल. यानंतर २१ डिसेंबरला अवकाळी पावसाला सुरुवात होण्याची शक्यता पंजाबराव डख यांनी वर्तवली आहे.



२६ तारखेपर्यंत राज्यात अवकाळी राज्यात अवकाळी पावसाची शक्यता

२१ तारखेला अवकाळी पाऊस सुरू झाला की २६ तारखेपर्यंत राज्यात अवकाळी पाऊस सुरू राहणार असल्याची माहिती पंजाबराव ढक यांनी दिली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांनी आपल्या शेती पिकांची काळजी घ्यावी. एवढेच नाही तर १७ ते १९ डिसेंबर दरम्यान तिरुपतीकडे ही मुसळधार पावसाची शक्यता पंजाबराव डख यांनी वर्तवली आहे.

अवकाळी पावसाच्या अंदाजामुळं शेतकऱ्यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. कारण, हा पाऊस फळ पिकांसाठी धोकादायक असतो. त्यामुळं द्राक्ष, डाळिंब केळी उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. मात्र, सध्या राज्यातील पावसाचं वातावरण निवळलं आहे. पुन्हा एकदा राज्यात थंडीचा जोर वाढला आहे. मात्र, २१ डिसेंबरपासून राज्यात भाग बदलत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शेतकऱ्यांना दरवर्षी नैसर्गिक संकटांचा मोठा फटका बसत असतो. या संकटामुळं अनेकवेळा हाती आलेली पिकं देखील वाया जाण्याची दाट शक्यता असते. त्यामुळं शेतकरी धास्तावल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळत आहे.

## संत्रावर्गीय फळपिकांवरील कोळी कीडीचे नियंत्रण



मोसंबी व संत्रा फळ पिकांवर कोळी कीडीचा प्रादुर्भाव आढळून येत असतो. कोळी ही कीड अष्टपाद वर्गातील असून, आकाराने सूक्ष्म असते. साध्या डोळ्याने दिसणे कठीण जाते. पानांच्या शिराजवळ किंवा बरेचदा फळांच्या सालीवर बारीक खळग्यात ती अंडी घालते. प्रौढ लांबट, पिवळे असून, पिल्ले फिक्कट पिवळसर असतात. पिल्ले व प्रौढ कोळी आकाराचा फरक सोडल्यास सारखेच दिसतात. रस्ट माईट व ग्रीन माईट या कोळी प्रजाती आहेत.

रस्ट माईट प्रादुर्भावाची लक्षणे : कीड पाने व फळांचा पृष्ठभाग खरवडतात व त्यातून येणारा रस शोषून घेतात, त्यामुळे पानांवर आणि फळांवर करडे ठिपके आढळून येतात. प्रादुर्भाव वाढल्यास फळांवर तपकिरी लालसर रंगाचे चट्टे पडतात. या अवस्थेला शेतकरी 'लाल्या' म्हणून ओळखतात. या किडीमुळे फळांचे नुकसान होऊन अनियमित आकाराची फळे तयार होतात. प्रादुर्भावग्रस्त फळांचा रंग बदलतो व प्रत खालावते. त्यामुळे बाजारात कमी भाव मिळतो. कोळी किडीचे व्यवस्थापन : उन्हाळ्यामध्ये पाण्याचा ताण दिलेल्या झाडांना योग्य प्रमाणात पाणी मिळत आहे याची खात्री करून घ्यावी. पाण्याचा ताण पडल्यास कोळीचा प्रादुर्भाव वाढतो. अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा अझेंडीरॅक्टीन (५%) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड. नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) २% प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी. कोळीचा प्रादुर्भाव दिसताच डायकोफॉल (१८५ ई सी) २ मिली किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्ल्यू पी) २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते.


## चार गायींच्या संकरापासून निर्मित राठी गाय ठरतेय सर्वाधीक उपयोगी

दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी जास्तीत जास्त दूध देणारी गाय महत्वाची असते. पण जर या गायीला खर्च कमी येत असेल तर अजूनच सोने पे सुहागा. या उपयुक्त गायीचे नाव आहे राठी गाय. राठ समाजाने थारपारकर, लाल सिंधी तथा साहिवाल आणि धन्नी या भारतीय गोवंशाचे संकर करून 'राठी' या गोवंशाची निर्मिती केली. राठ नावाच्या भटक्या मुस्लिम जमाती ने याचे मोठ्या प्रमाणावर संगोपन केले आहे, त्यामुळे या गोवंशाला 'राठी' किंवा 'राठ' असे नाव पडले.

देशी गायींमध्ये राठी जातीची गाय ही फार चांगली मानली जाते. राजस्थानच्या बीकानेरपासून ते पंजाबच्या सीमेपर्यंतच्या प्रदेशात आढळणाऱ्या या गायीला राजस्थानची कामधेनूही म्हटले जाते. या जातीच्या गायी देशाच्या अनेक भागात सहज दिसतात. उत्तर प्रदेशात शेतकरी या गायी कमी किमतीत विकत घेऊन पाळू शकतात. या गायींची किंमत २० हजार रुपयांपासून ६० हजार रुपयांपर्यंत आहे. साहिवाल गायीशी मिळते जुळते गुणधर्म या गायीचे आहेत. इतर गाई पेक्षा दूध देण्याची क्षमता या गाईंची जास्त असते. जर वातावरण पोषक असेल तर पशुपालक या गाईंपासून जास्तीचे दुधाचे उत्पन्न मिळू शकतात.

शरीर रचना : राठी गाय ही तिच्या रंगाने आणि आकाराने दिसायला आकर्षक आहे. या गोवंशाचा आकार मध्यम असून अंग भरीव असते. या गोवंशाचे डोके मोठे असून कपाळ रूंद आणि पसरलेले असते. डोळे काळे आणि पाणीदार असतात. कान छोटे असून आतील बाजूस लालसर तपकिरी असतात. या गोवंशाची मान थोडी आखूड असून गळकंबळ किंवा पोळी थोडी मोठी आणि आखीव असते. पाय सामान्य आकाराचे असून खुर मात्र मोठे आणि काळे असतात. शेपटी लांब असून शेपुटगोंडा झुपकेदार, केसाळ आणि काळ्या रंगाचा असतो. या गोवंशाचा रंग लाल-तांबडा असून त्यावर पांढरे डाग असतात आणि पोटाशी रंग फिक्कट होत गेलेला असतो. या जातीच्या गायीची उंची सुमारे १४४ सेंटीमीटरपर्यंत आहे. याशिवाय राठी जातीच्या गायीचे वजन सुमारे ३०० किलो असते. या जातीच्या बैलाचे वजन सुमारे ३५० किलो असते.

दूध उत्पादन : देशी जातीच्या गायीत राठी गाय ही दूध उत्पादनात सर्वात महत्त्वाची मानली जाते. या जातीची गाय ही एक वर्षाला सुमारे २८०० किलो दूध देते. वयाच्या ३६ ते ५२ व्या वर्षी राठी गाईचे पहिले दुग्धपान सर्वोत्तम मानले जाते. त्यानंतर ते दररोज ८ ते १८ लिटर दूध देते.




## सेंद्रीय कीटकनाशक दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत

पिकांची पेरणी/ लागवड झालेली आहे. सुरुवातीच्या काळात पिकांवर रसशोषक किडी आणि काही अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. यावेळी सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून या किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून हे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.

दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर :कडुनिंब पाला ५ किलो, एरंडपाला २ किलो, गुळवेलपाला २ किलो, घाणेरीपाला २ किलो, पपईचा पाला २ किलो, सिताफळाचा पाला २ किलो, रूईचा पाला २ किलो, पांढरा धोतरा २ किलो, करंजपाला २ किलो, लाल कन्हेरपाला २ किलो, झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य :प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये. गोमूत्र जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.



दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत : यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे. वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसूण ठेचा, देशी गायीचे शेण व गोमूत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकून ठेवून असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे. दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा. दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.

दशपर्णी अर्काचा वापर : दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्याच्या आत वापरता येते. मात्र अर्क बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवलेला असावा. दशपर्णी हा तयार झालेला अर्क कीड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्यात २०० मिली दशपर्णी अर्क फवारणीसाठी वापर करावा. फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी.

दशपर्णी अर्काचे फायदे : दशपर्णी अर्काच्या फवारणीमुळे मित्र किडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होते. उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात. रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहत नाहीत. अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते. पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेती मालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळतो. दशपर्णी अर्क तुडतुडे, मावा, फुलकिडे, पहिल्या २ अवस्थेतील अळ्या यांच्यावर प्रभावी काम करते याची फवारणी शक्यतो दर ८ दिवसाला करावी.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक चहा दिन

### महत्वाच्या घटना

१८०३ : नागपूरकर भोसलेंनी ओरिसाचा ताबा इस्ट इंडिया कंपनीकडे दिला.
१९११ : बनारस हिन्दू युनिवर्सिटी सोसायटी ची स्थापना केली गेली.
१९१७ : युरोप चा देश मॉल्डोवा ने रशिया पासून स्वतःला स्वंतंत्र घोषित केले.
१९४१ : जपानी सैन्याचा हाँगकाँगमध्ये प्रवेश झाला.
१९५३ : भारताच्या एस विजयलक्ष्मी पंडित ह्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पहिल्या महिला अध्यक्ष बनल्या होत्या.
१९६० : नेपाळचे राजा महेन्द्र यांनी देशाचे संविधान, संसद आणि कॅबिनेट निलंबित करून थेट शासन लादले.
१९६१ : हिटलर च्या आयोजकांपैकी एक ॲडॉल्फ आयचमन याला फाशीची सजा दिली गेली.
१९७० : व्हेनेरा ७ हे रशियाचे अंतराळयान यशस्वीपणे शुक्र ग्रहावर उतरले. पृथ्वी सोडुन इतर कुठल्याही ग्रहावर उतरणारे हे पहिलेच यान होते.
१९७१ : बांगलादेश स्वतंत्र झाला.
१९७६ : सामोआचा संयुक्त राष्ट्रसंघातप्रवेश
१९९१ : चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांना 'ऑस्कर पारितोषिक' जाहीर
१९९२ : ला भारतीय चित्रपट निर्माता सत्यजित रेऑस्कर पुरस्कारानेसन्मानित.
१९९७ : ला भारताच्या लेखिका अरुंधती रॉय यांना ''द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'' या पुस्तकासाठी बुकर पुरस्काराने सन्मानित.
१९९८ : बँकॉक येथील आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला कबड्डीमधे सलग तिसर्यांदा सुवर्णपदक
२००० : ला चेरनोबिल न्यूक्लियर पॉवर प्लांट जनावर आणि पक्षांना हानिकारक असल्याने कायमचे बंद करण्यात आले.
२००१ : इटली चे पिसा टॉवर ११ वर्ष बंद राहिल्यानंतर पुन्हा उघडण्यात आले होते.
२००३ : फ्रांसचा फुटबॉलपटू झिनादिन झिदान यांची वर्षातील सर्वोत्कृष्ट फुटबॉलपटू म्हणून निवड झाली.
२००३ : भूतान ने त्यांच्या देशात राहणाऱ्या भारतीय वेगळेवादी यांच्या विरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात केली.
२००५ : इराक मध्ये नवीन सरकार निवडण्यासाठी मतदान पार पडले.
२००८ : झालेल्या संसद हल्ल्याची चौकशी करण्यासाठी राष्ट्रीय अन्वेषण एजन्सीच्या स्थापनेच्या प्रस्थावला मंजुरी.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

६८७ : पोप सर्गिअस (पहिला) (मृत्यू: ८ सप्टेंबर ७०१)
१८३२ : गुस्ताव्ह आयफेल फ्रेंच वास्तुरचनाकार आणि अभियंता (मृत्यू: २७ डिसेंबर १९२३)
१८५२ : हेन्री बेक्वेरेल नोबेल पारितोषिक विजेते (१९०३) फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २५ ऑगस्ट १९०८)
१८६१ : दुर्यिया मोटर वॅगन कंपनीचे संस्थापक चार्ल्स दुर्यिया यांचा जन्म. (मृत्यू: २८ सप्टेंबर १९३८)
१८९२ : जे. पॉल गेटी गेटी ऑईल कंपनीचे संस्थापक, अमेरिकन उद्योजक आणि लोकहितबुद्धी (मृत्यू: ६ जून १९७६)
१९०३ : स्वामी स्वरुपानंद (मृत्यू: १५ ऑगस्ट १९७४)
१९०५ : इरावती कर्वे साहित्य अकादमी व महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेत्या मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ञ (मृत्यू: ११ ऑगस्ट १९७०)
१९०५ : चौथ्या लोकसभेचे अध्यक्ष रघुनाथ केशव खाडिलकर यांचा जन्म.
१९२२ : भारताचे माजी क्रिकेटर रुसी कूपर यांचा जन्म.
१९२६ : प्रहसन लेखक व अभिनेते बबन प्रभू यांचा जन्म.
१९३२ : टी. एन. शेषन प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सरकारी अधिकारी
१९३३ : लोकसाहित्याचे अभ्यासक लेखक डॉ. प्रभाकर मांडे यांचा जन्म.
१९३३ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक बापू यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑगस्ट २०१४)
१९३५ : उषा मंगेशकर पार्श्वगायिका व संगीतकार
१९३७ : संतसाहित्य, भाषाविज्ञान अभ्यासक प्र. कल्याण काळे यांचा जन्म.
१९७४ : भारताच्या प्रसिद्ध व्होकलायझर रसूलन बाई यांचे निधन.
१९७५ : भारताचे नौदल सैनिक नवांग कापडिया यांचा जन्म.
१९७६ : भारतीय फुटबॉलपटू बैचुंग भुतिया यांचा जन्म.
१९८१ : भारतीयहॉकीखेळाडू भारत छत्री यांचा जन्म.
१९८८ : भारताची प्रसिद्ध कुश्तीपटू गीता फोगाट यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७४९ : छत्रपती शाहू महाराज (जन्म: १८ मे १६८२)
१८५० : स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधानमंत्री आणि पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे निधन. (जन्म: ३१ ऑक्टोबर १८७५)
१८७८ : बेकिंग पावडरचे शोधक आल्फ्रेड बर्ड यांचे निधन.
१९५० : सरदार वल्लभभाई पटेल स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व पहिले गृहमंत्री, भारताचे लोहपुरुष, भारतरत्न (मरणोत्तर १९९१) (जन्म: ३१ आक्टोबर १८७५)
१९५२ : ला स्वातंत्र्य सैनिक पोट्टि श्रीरामुलु यांचे निधन.
१९६६ : वॉल्ट इलायन डिस्ने ॲनिमेशनपटांचे प्रणेते, 'मिकी माऊस'चे जनक (जन्म: ५ डिसेंबर १९०१)
१९८५ : शिवसागर रामगुलाम मॉरिशसचे पहिले प्रधानमंत्री (जन्म: १८ सप्टेंबर १९००)
२००० : प्रसिद्ध लेखक तसेच पत्रकार गौर किशोर घोष यांचे निधन.
२०१३ : लोकसभेचे सदस्य सीस राम ओला यांचे निधन.
२०१३ : इंडिअन आयडल च्या दुसऱ्या सीजन चे विजेते संदीप आचार्य यांचे निधन.

# सामान्य जनतेवरील अन्याय खपवून घेणार नाही- आ. संदीप क्षीरसागर

## आ.संदीप क्षीरसागर सामान्य जनतेच्या मनातील आमदार - राजेंद्र मस्के
## बेलखंडी- नागझरी नामाजीबुवा डांबरी रस्ता कामाचे उद्घाटन

बीड। प्रतिनिधी

मसाजोग येथील घटना अत्यंत क्रुर व निंदनीय घडली. जातिपातीचा विषय नसून माणुसकीला काळीमा फासणारी दुर्दैवी घटना, असा अन्याय कोणावरही होऊ नये. सामान्य जनतेवर होणारा अन्याय, अत्याचार खपवून घेणार नाही. असा इशारा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी दिला आहे.

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बेलखंडी फाटा, नागझरी ते नामाजी बुवा या सहा किलोमीटर डांबरी रस्ता कामाचे उद्घाटन मोजे बेलखंडी येथे आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून संपन्न झाले. पुढे बोलताना आ. संदीप क्षीरसागर म्हणाले, कठीण परिस्थितीत जनतेने मला साथ दिली. सामान्य मतदारांनी मतदानरुपी आशीर्वाद दिले. आयुष्यात मिळालेली ही साथ विसरणार नाही. लिंबागणेश गटातील मतदार बांधवांनी मताधिक्य देऊन माझ्या विजयात हातभार लावला. या परिसरातील विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. आपल्या हक्काचा निधी खेचून आणणार. विकास कामाला कायम मदत करणार. निवडणुका, विकासकामे असो अथवा



अन्याय महाविकास आघाडी भविष्यात एकजुटीने लढा देणार व जनतेचे हित साध्य करणार. असा विश्वास दिला.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी श्री परमेश्वर सातपुते जिल्हाप्रमुख शिवसेना उबाठा, श्री गणेश वरेकर शिवसेना जिल्हाप्रमुख उबाठा, श्री वैजनाथ नाना तांदळे राष्ट्रवादी, श्री गोरख सिंघन शिवसेना, बाळासाहेब गोरे राष्ट्रवादी, सरपंच सुभाष मस्के, संजय पवार कार्यकारी अभियंता जीप बीड, पोपटराव जोगदंड मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, अनुरथ सानप गटविकास अधिकारी, ग्रामसेवक देशमाने, अक्षय शिंदे तलाठी, आरोग्य अधिकारी मर्कड साहेब उपस्थित होते.

बीड विधानसभा निवडणूक अत्यंत वेगळ्या परिस्थितीत लढली गेली. धनशक्ती विरोधात जनशक्तीचा सामना झाला. पैशाचा पाऊस पडला. परंतु हुशार मतदारांनी आपल्या मनातील आमदार म्हणून संदीप क्षीरसागर यांना मत दिले. मागील पाच वर्ष नेतृत्वाशी एकनिष्ठ राहीले. पहाटची शपथ अथवा आलेल्या आमिषाला ठोकर मारली. म्हणूनच त्यांच्या एकनिष्ठेचे चीज झाले. या पाच वर्षात सामान्य जनतेनी टाकलेला विश्वास सार्थ करण्यासाठी आमदार संदीप क्षिरसागर यशस्वी ठरतील. आणि मतदार संघातील विकास कामांना गती देतील. असा विश्वास राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला. बेलखंडी फाटा ते बेलखंडी गावकऱ्यांनी आमदारांची मिरवणूक काढून भव्य सत्कार केला. तसेच आमदार क्षीरसागर यांनी जि.प. शाळेला भेट देऊन परिसराची पाहणी केली. या उद्घाटन कार्यक्रमासाठी परिसरातील चंद्रसेन शेळके, महादेव नेहराळे, पांडुरंग कानडे, गुंडीबा देवडे, संदीप धुमाळ, सुभाष मस्के, किशोर शेळके, उद्धव जाधव, लालासाहेब पन्हाळे, रावसाहेब मस्के, बिभीषण मुळीक, अमोल माने, अशोक वाणी, सुभाष बहीरवाळ,बाळासाहेब गात, विलास काकडे, सुधाकर चव्हाण, शामराव तुपे, गणेश वाणी, आसेफ पठाण, शरद बहिरवारवाळ, राम बहीरवाळ, राहुल मुळे, शेषेराव बहिरवारवाळ, राकेश बिराजदार, श्याम कोठुळे जमील भाई, शफिक काजी, अश्विन शेळके पंकज धांडे, उद्धव जाधव सुग्रीव डोके, आबा येळवे, शरद बहिरवाळ, शरद बडगे, शामराव तुपे गुरुजी, कल्याणराव पवार, योगेश चव्हाण, यांच्यासह परिसरातील सरपंच उपसरपंच पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. बेलखंडी ग्रामस्थांच्या वतीने महेश सावंत, अजय सावंत, संघर्ष माने, गोकुळ सावंत, अक्षय बजगुडे, दत्ता सावंत, अनिकेत भारती, अभिषेक भिंगले, जितेंद्र तुपे, सरपंच गुंडीबा देवडे, अशोक काळे, अनिल माने, आबासाहेब येळवे, बाबुराव पाहुणे, संपत मंडलिक, शिवाजी भिंगले, साहेबराव बजगुडे, सतीश वजगुडे, किशोर तुपे, श्रीमंत तुपे, नानाभाऊ भिंगले, सलाम शेख, मुनीर पठाण, जरजिस पठाण, पुरुषोत्तम कासारे, बंडू फाळके, भागवत सावंत, बाळू भिंगले, महादेव जाधव, दादा माने, बाळासाहेब माने यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

# श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयात विज्ञान,गणित, पर्यावरण प्रदर्शन

पिंपळवंडी। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.गंगाभारती महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,श्री. स्वामी अमृत भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ५२ वो तालुकास्तरीय विज्ञान,गणित व पर्यावरण प्रदर्शन मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे प्रमुख तथा महंत महादेवानंद भारती महाराज यांचे शुभहस्ते व पिकवणे साहेब गटविकास अधिकारी पाटोदा,तसेच सरपंचपती निलेश मोरे, उपसरपंच दादासाहेब पवार आदी पाहुण्यांच्या उपस्थित होऊन तसेच कार्यक्रमाचा समारोप संस्थेचे सहसचिव प्रताप पवार सर तसेच शिक्षण विस्तार अधिकारी रामचंद्र सुळे,केंद्रप्रमुख गोविंद कदम सर (पिंपळवंडी),चंद्रकांत उकांडे सर (अंमळनेर),जयराम बिनवडे सर (पाटोदा),खंडागळे सर(पारगाव) मुख्याध्यापक ए.एम.पवार सर,बिनवडे सर,पत्रकार बबनराव उकांडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.या प्रदर्शनात प्राथमिक विभागात प्रथम क्रमांक श्री.गणेश विद्यामंदिर अंमळनेर या शाळेने तर माध्यमिक विद्यालयात केशवराज विद्यालय दासखेड शाळेने मिळवला. प्रदर्शनात एकूण ४० विविध प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले.त्यामध्ये प्राथमिक विभागात २० व माध्यमिक विभागात २० प्रयोगाचा समावेश होता.प्रदर्शनास परिसरातील विविध शाळेतील सुमारे दीड हजार



विद्यार्थ्यांनी भेट देऊन प्रदर्शनाचा लाभ घेतला.या प्रदर्शनात पुढील प्रमाणे विद्यालयाने व विद्यार्थ्यांनी प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक मिळवून त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड निश्चित झाली आहे.

प्राथमिक विभागातून प्रथम-अनविता जालिंदर मिसाळ,श्री गणेश विद्यामंदिर अंमळनेर प्रयोग-नैसर्गिकरित्या जलशुद्धीकरण, द्वितीय-मेहराज जहीर,शेख अनिस कलीम जि.प.कें.प्रा.शाळा पाटोदा, प्रयोग-स्मार्ट इरिगेशन,तृतीय-सोहम सुनील देशमाने,समर्थ सोमनाथ कुंभार प्रयोग-ॲडिशनल अटॅचमेंट ऑक्ट्रेन, उत्तेजनार्थ-समर्थ सयाजी पवार,सुरज सोमनाथ मोरे,श्री.स्वामी अमृत भारती विद्यालय पिंपळवंडी प्रयोग-नैसर्गिक शेती,माध्यमिक विभाग प्रथम-व्यंकटेश मालोजी कोकाटे,संदीप अनिल ठोंबरे,चेतन संतोष खोमणे केशवराज विद्यालय दासखेड प्रयोग-कार्बाईट गन, द्वितीय-पठाण अबिदा, शेख आलिया प्रियदर्शनी कन्या शाळा पाटोदा प्रयोग-आपत्ती व्यवस्थापन, तृतीय-अवनी नवनाथ डोके,मयुरी जयराम मळेकर जानपीर विद्यालय नाळवंडी प्रयोग-नैसर्गिक शेती, उत्तेजनार्थ १)-निखिल दादासाहेब मोरे, शशिकांत मोहन भिलारे श्री.स्वामी अमृत भारती विद्यालय पिंपळवंडी प्रयोग-टेलिस्कोप,२)ओमराजे अशोक नागरगोजे,शुभम ब्रह्मदेव खाडे सोमेश्वर विद्यालय पाटोदा प्रयोग-हॅलो ग्राम विथ सोलार लाईट आदीप्रमाणे विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रदर्शनातील प्रयोगांचे मूल्यांकन प्रा.बी.सी.वराट, प्रा.पि.डीआटकरे पी.व्ही.पी.कॉलेज पाटोदा, एस.एस. भोरे जय भवानी विद्यालय पाटोदा यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या सर्व शिक्षक,कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रविण मुळे सर व कैलास पवार सर यांनी केले.

# सकल मराठा समाजाच्या वतीने शिरूर शहर कडकडीत बंद

## व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद- एस.आय.टी नेमण्याची मागणी

मानूर। प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करणाऱ्या आरोपींना त्वरित अटक करून या प्रकरणात एस.आय.टी स्थापन करण्याची मागणी सकल मराठा समाज बांधवांनी पोलिसांना निवेदनाद्वारे केली आहे.जिल्हा बंदचे औचित्य साधून शिरूर शहरात देखील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते.

दिवसभर शहरासह तालुक्यातील महत्वाच्या बाजारपेठा असलेल्या




गावांमध्ये देखील कडकडीत बंद पाळण्यात आला.या बंदला व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपला पाठींबा दिला.सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणी दोषी असलेल्या आरोपींना तात्काळ अटक करून या प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कडक कारवाई करण्याची मागणी संतोष गुजर,गणेश तांबे, बाळासाहेब गायकवाड, विनोद पवार, अशोक शिंदे, सागर काटे, स्वप्नील खोले, अमोल थोरात, शुभम काटे, सुनील सवासे, जगन्नाथ जाधव यांच्यासह मराठा बांधवांनी केली आहे. शहरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस स्टेशनच्या वतीने सहपोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## गिरजा आप्पा पिराजी मस्के यांचे निधन

परळी। प्रतिनिधी



परळी वैजनाथ साठेनगर येथील सामाजिक कार्यकर्ते सुनील मस्के यांचे वडील गिरजा आप्पा पिराजी मस्के यांचे आज शनिवार रात्री दोन वाजता दुःखद निधन झाले त्यांचे मृत्यू समई वय ७० वर्षे होते साठेनगर मधील एक अतिशय मनमिळाऊ सामाजिक कार्यकर्ते शाहू फुले आंबेडकर साठे विचारांचे पाईक होते ते अनेक समाज विकासाच्या कार्यक्रमात हिरारीने भाग घेत असत त्यांची शनिवारी रात्री २ वाजता अचानक प्राणज्योत मालवली आज शनिवार रोजी साठे नगर जवळील समशानभूमीत त्यांचे वर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी असंख्य नातलग व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते गिरजा आप्पा पिराजी मस्के यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली सुना नातवंडे पत्नी जावई नातू असा मोठा परिवार आहे मस्के परिवाराच्या दुःखात दैनिक रयतेचा आधार परिवार सहभागी आहे व त्यांचा राख सावडण्याचा विधी सोमवार दिनांक १६/ १२/ २०२४ रोजी सकाळी आठ वाजता होणार आहे.

# बीड जिल्हा बंदच्या हाकेला प्रतिसाद देत चौसाळा येथे कडकडीत बंद

चौसाळा। प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येच्या निषेधार्थ व या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी व कठोर कारवाईच्या मागणीसाठी सकळ मराठा समाज व विविध राजकीय पक्ष यांनी आज दि.१३ शुक्रवार रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या हाकेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत चौसाळा येथील विविध व्यापारी, हॉटेलचालक, यांनी स्वतःहुन दुकाने बंद ठेवून बंद पाळला. या प्रकरणातील आरोपींच्या अटकेची मागणी करतच यामागील सुत्रधार, राजकीय दबावाखाली काम करणारे पोलिस प्रशासनातील अधिकारी यांच्यावर सुद्धा



कारवाई करण्यात यावी अशी मागणी. चौसाळाकर ग्रामस्थांनी केली आहे.

# स्वाराती रुग्णालयात औषधांची व त्यांच्या गुणवत्तेची चौकशी करा- आ.मुंदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे मागील तीन वर्षापासून आज पर्यंत खरेदी केलेल्या औषधांची व त्यांच्या गुणवत्तेची चौकशी करून कार्यवाही करणेबाबत आदेश द्यावेत आशी लेखी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.


येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रुग्णांना निष्क्रिय व बनावट औषधींचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघडकीस आली आहे. याप्रकरणी ठाणे, भिवंडी, कोल्हापूर आणि सुरत (गुजरात) मधील चौघांवर अन्न व औषध प्रशासनाचे निरीक्षक यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि अतिशय गंभीर बाब आहे.सदर रुग्णालयात सतत मंजूर खाटांच्या दुप्पट रुग्ण दाखल असतात तर बाह्यरुग्ण विभागत दररोज २००० पेक्षा जास्त रुग्णांची सेवा केली जाते. बनावटी प्रकारामुळे रुग्णात भीतीचे वातावरण पसरले आहे. सदर प्रकार महाविद्यालय व रुग्णालयातील प्रमुखाच्या संगनमताने घडल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर रुग्णालयात मागील तीन वर्षापासून खरेदी करण्यात आलेल्या संपूर्ण औषधांची व त्यांच्या गुणवत्तेची चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे.आज पर्यंत खरेदी केलेल्या औषधांची व त्यांच्या गुणवत्तेची चौकशी करून कार्यवाही करणेबाबत आदेश द्यावेत आशी लेखी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# माजलगाव धरणातून रब्बी हंगामातील पहिले आवर्तन आज सोडणार

## उजव्या कालव्यात कोणीही उतरु नये, पाटबंधारे विभागाचा सतर्कतेचा इशारा

माजलगाव। प्रतिनिधी

माजलगाव धरणातील रब्बी हंगामात एकुण सात आवर्तन सोडण्याचा निर्णय कालवा समितीच्या बैठकीत ठरला आहे.त्यामुळे माजलगाव धरणातुन रब्बी हंगामातील पिकांसाठी उजवा कालवातुन पहिले आवर्तन आज दि १५ डिसेंबर रविवार रोजी सकाळी ११:०० वाजता २०० क्युसेकने वाढवून ४०० क्युसेकने विसर्ग सोडण्यात येणार आहे.त्यामुळे उजव्या कालव्या जवळील गावातील शेतकऱ्यांनी कोणीही कालव्यात उतरु नये किंवा पशुधन बांधु नयेत असा सतर्कतेचा इशारा



पाटबंधारे विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

माजलगाव धरणातील रब्बी हंगामात एकुण सात आवर्तन सोडण्याचा निर्णय कालवा समितीच्या बैठकीत झाला होता.त्यानुसार माजलगाव धरणातुन रब्बी हंगामातील पिकांसाठी उजवा कालवातुन पहिले आवर्तन आज दि १५ डिसेंबर रविवार रोजी सकाळी ११:०० वाजता २०० क्युसेकने वाढ करुन ४०० क्युसेकने विसर्ग सोडण्यात येणार आहे.त्यामुळे माजलगाव धरणातील उजव्या कालव्या लगतच्या ढोरगाव,आनंदगाव, हिंगणवाडी, लोणगाव,पात्रुड, जीवनापूर,उमरी, सिमरी,पारगाव, मोगरा या गावातील हद्दीतील शेतकऱ्यांनी कोणीही कालव्यात उतरु नये किंवा पशुधन बांधु नयेत असा सतर्कतेचा इशारा पाटबंधारे विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

# बीड गोळीबार प्रकरणातील आरोपी आमदाराचा समर्थक असल्याने आमदाराची चौकशी करा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची पोलीस प्रशासनाकडे मागणी

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही, म्हणत बोंब ठोकणाऱ्या बीडच्या आमदाराशी संबंधित व्यक्ती गोळीबार प्रकरणात आरोपी आहे. अशी प्रकरणे बीड विधानसभा मतदारसंघात आमदाराच्या वरदहस्तामुळे सातत्याने घडत आहेत. त्यामुळे गोळीबार प्रकरणाची सखोल चौकशी करून आमदाराला सहआरोपी करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे.



पत्रकात पुढे म्हटले आहे की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींना अटक करून कडक कारवाई करावी ही आपली सुरुवातीपासूनच भूमिका आहे. या प्रकरणात बीडच्या आमदाराने राजकारण करत राजकीय भांडवल होईल, अशी विधाने केली. ती विधाने करण्याचा नैतिक अधिकार त्यांनी केव्हाच गमावलेला आहे. गत पाच वर्षात व्यापारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल करण्यापलीकडे त्यांनी दुसरे काहीही केलेले नाही. मागे बीडमध्ये आदित्य कॉलेजजवळ झालेल्या खून प्रकरणात आमदाराचे जवळचे नातलग आरोपी आहेत. दोन-अडीच वर्षापूर्वी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ॲड.राजेंद्र राऊत यांच्यावर राजकीय दबावातून आमदारांनी खोटी ॲट्रॉसिटी व ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल करायला लावले. माझ्यासह सहकाऱ्यांवर हनुमंत वाघमारे यांच्याकरवी करायला लावलेली ॲट्रॉसिटी देखील पूर्णपणे खोटी ठरली. तसेच सतीश पवार यांच्या संपत्तीच्या प्रकरणात वारंवार हस्तक्षेप करून आमदाराने खंडणी गोळा करण्यासाठी गुंड पाठविले. त्यावेळी रजिष्ट्री कार्यालयात हल्ला घडवून आणला, त्यावेळी आत्मसंरक्षणासाठी परवानाधारक शस्त्रातून सतीश पवारांना हवेत गोळीबार करावा लागला, हा इतका मोठा वाद आमदारांनी निर्माण केला. अशा खोट्या केसेस करण्यासाठी काही दलित बांधवांना हाताशी धरून त्यांचा वापर केला जातो. त्यामुळे समाजात तेढ निर्माण होते. हा आमदाराचा इतिहास पाहता बीडच्या गोळीबार प्रकरणात देखील त्यांचा हात असू शकतो, आरोपी हा त्यांच्याशी संबंधित व्यक्ती आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचे धडे शिकविणाऱ्या बीडच्या आमदाराची देखील कसून चौकशी व्हायला हवी, अशी मागणी डॉ. योगेश क्षीरसागर यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

### पवनचक्की प्रकरणात चौकशी कराच

केज तालुक्यातील मस्साजोग खून प्रकरणाचे बीडच्या आमदाराने राजकरण करू नये. आरोपींसोबतचे माझे फोटो व्हायरल करून खोटे आरोप केले जात आहे. माझी कोणतीही चौकशी करावी, मी कसल्याही चौकशीसाठी तयार आहे. यात माझा कुठेही संबंध आढळून आल्यास राजकीय संन्यास घेईल. परंतु बीडमध्ये आमदाराचा वरदहस्त असल्यामुळे पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली आहे. त्यामुळे पवनचक्कीच्या प्रकरणात बीडच्या आमदाराचीही कसून चौकशी व्हावी. कॉल डिटेल्स तपासवेत. त्यासाठी ते तयार आहेत का? हे बगलबच्चांनी आमदाराला विचारून स्पष्ट करावे. याबाबत आमदाराने मीडियासमोर पुढे येऊन बोलण्याची तयारी दाखवावी, असे आव्हान डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले आहे.

# लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात श्रीदत्त जयंती साजरी



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात विश्वस्तांनी आज दि.१४ शनिवार रोजी दत्त जन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दत्त जयंतीला धार्मिक मान्यतेनुसार श्रीदत्तात्रेयसह लक्ष्मी नारायणाची पुजा करण्यात आली. यावेळी चौरंगावर पांढरे वस्त्र टाकुन त्यावर दत्तात्रेय महाराजांची मुर्तीची स्थापना करण्यात येऊन पंचामृताने दत्तात्रेयाचा अभिषेक करण्यात आला.धुप, दिवा, फुलं, नैवेद्य अर्पण करत आरती करण्यात आली.हिंदु धर्मात मार्गशीर्ष महिन्याला विशेष महत्त्व आहे.मार्गशीष महिन्यातील शुक्ल पक्षातील पोर्णिमेला दत्ताचा जन्म झाला म्हणून हा दिवस दत्त जयंती म्हणून साजरा केला जातो. दुपारी १२ ते १ दरम्यान महाआरती, भजन, किर्तन व दुपारी १ ते ५ पर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी बाळुकाका पाटोदकर, बंडु पाटोदकर,राजेभाऊ गिरे, विनायक वाणी,रामकिसन गिरे, सुदाम रणखांब, जयदेव गिरे,अंकुश गिरे, अर्जुन गिरे,उमेश जोगदंड आदिंनी परीश्रम घेतले.

# परभणीतील कोंबींग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या

## आ.संदीप क्षीरसागरांची पोलीस महासंचालकांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान केल्याचा प्रकार घडला होता. याचा निषेध म्हणून आंबेडकरी समाजबांधवांनी परभणीमध्ये आंदोलन केले होते. त्यामुळे अनेक समाजबांधवांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि होत आहेत. तसेच कोंबींग ऑपरेशन करून नागरिकांना मारहाण केली जात आहे. दरम्यान भारतीय राज्यघटना म्हणजे आपल्या अस्मितेचा विषय असल्याने त्याबाबत कसलीही अवहेलना समाज खपवून घेऊ शकत नाही. या भावनेतून हे आंदोलन करण्यात आले होते. तरी पोलिस प्रशासनाने कोंबिंग ऑपरेशन थांबवून, आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घटनाकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आहे व पुतळयाच्या जवळच भारतीय संविधानाची प्रतिकृती साकारलेली आहे. मंगळवारी (दि.१०) रोजी या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना एका माथेफिरूकडून करण्यात आली. शेवटी भारतीय संविधान हा सर्वांच्याच अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी समाजबांधवांनी आंदोलने केली. आंदोलनाला अल्प प्रमाणात हिंसक वळण आले. त्यामुळे पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन करून आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे सुरू आहे. परंतु या आंदोलनाचा हेतू हा मुळीच हिंसा पसरवणे नव्हता. समाजबांधवांनी लोकशाही मार्गानेच आंदोलन केले होते. परंतु अशा आंदोलनाच्या आडून काही प्रवृत्ती हिंसा पसरविण्याचे काम करत असतात हे बर्याचवेळा लक्षात आले आहे. ही बाब लक्षात घेत, कोंबिंग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक यांच्याकडे केली आहे.

# देशमुख कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही –खा.पाटील

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील सरपंच देशमुख यांची झालेली हत्या वेदनादायी आहे. घटनेच्या सात दिवसानंतरही सर्व आरोपी अटक झालेले नाहीत. जोपर्यंत देशमुख कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही. आपण संसदेत हा विषय लावून धरू या भावना खासदार रजनी पाटील यांनी व्यक्त केल्या. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची शनिवारी खासदार रजनी पाटील यांनी भेट घेतली. देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केल्यानंतर रजनी पाटील यांनी आपण देशमुख कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. यातील सर्व आरोपी अटक झाले पाहिजेत असे सांगितले. जोपर्यंत देशमुख कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही



असेही पाटील म्हणाल्या. खासदार रजनी पाटील यांनी तेथूनच बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्याशी संपर्क साधला आणि या प्रकरणातील सद्यस्थितीची माहिती घेतल्यानंतर त्यांनी यातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करा नाहीतर जन आक्रोश थांबणार नाही असे निर्देश पोलीस अधीक्षकांना दिले. देशमुख कुटुंबाची भेट घेताना खासदार रजनी पाटील यांना अश्रू अनावर झाले होते. यावेळी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, काँग्रेस चे जेष्ठ नेते नवनाथ थोटे, हनुमंत मोरे, केज तालुका काँग्रेसचे माजी अध्यक्ष प्रवीण कुमार शेप, महिला काँग्रेस च्या जिल्हाध्यक्ष मिनाक्षी पांडुळे यांची उपस्थिती होती.

# ओजस अनिल कुलकर्णीची इस्त्रो अभ्यास सहलीसाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

नोबेल फांऊडेशन आणि भवरलाल जैन फांऊडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभरात नोबेल सायन्स टॅलेंट सर्च () ही परीक्षा घेतली जाते, यात प्रथम पात्रता परीक्षा नंतर लेखी परीक्षा आणि त्यात निवड होणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांची मुलाखत परीक्षा घेतली जाते, या तिन्ही अडथळ्यांच्या परीक्षा पूर्ण केल्यानंतर इयत्ता निहाय विद्यार्थ्यांची निवड केली जाते,




या परीक्षेत यश मिळवून निवडलेल्या विद्यार्थ्यांना या फाऊंडेशन मार्फत प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देण्यात येतेच परंतु या बाल वैज्ञानिकांना इस्त्रो या भारतीय अवकाश संशोधन केंद्र या ठिकाणी अभ्यास सहलीला जाण्याची संधी मिळते.शहरातील सिंधफणा पब्लिक स्कुल माजलगाव याठिकाणी इ.८वी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी चि.ओजस अनिल कुलकर्णी याची या वर्षी निवड झालेली आहे,विशेष म्हणजे या परीक्षेत त्याच्या इयत्तेतून तो महाराष्ट्रातुन ३ रा क्रमांक आला आहे, शिवाजी नगर माजलगाव येथे राहणारे जि.प.शिक्षक अनिल सुभाषराव कुलकर्णी (नागडगावकर)यांचा तो मुलगा आहे.त्याच्या या यशाबद्दल त्याचे शाळेद्वारे व समाजातील सर्व माध्यमाद्वारे कौतुक करण्यात येत आहे.



माजलगाव: महाराष्ट्र राज्याचे माहायुतीचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आ.प्रकाश सोळंके यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्या बद्दल शुभेच्छा दिल्या !

# सत्यशोधक बन्सी सोनवणे यांचे निधन

**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा येथील जुन्या पिढीतील समाजसेवक तथा सत्यशोधक व जलसा कलाकार श्री बन्सी बाबा सोनवणे यांचे नुकतेच दि.१४/१२/२०२४ सकाळी वृद्धपाकाळाने वयाच्या १०५ व्या वर्षी दुखद निधन झाले आहे कै बाबा सोनवणे हे जुन्या पिढीतील सत्यशोधक कलाकार म्हणून परिचित होते त्यांचा स्वभाव गरीब व मनमिळाव होता त्यांच्या मागे पत्नी चार मुले नातवंडे असा परिवार आहे त्यांच्या अंत्यविधीला गावातील सर्व स्तरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते त्यांच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे



# भानुदास गायकवाड यांचे दु:खद निधन

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील पिंपरी (घाटा) येथील दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते भानुदास गहिनीनाथ गायकवाड वय ७८ वर्षे यांचे हृदयविकाराची तिव्र झटक्याने अहमदनगर येथे उपचार दरम्यान गुरुवार दिनांक १२ रोजी निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी ध्रुपात बाई गायकवाड विक्रम गायकवाड (मुलगा )विष्णू गायकवाड( मुलगा )छाया कांबळे (मुलगी )९ नातवंडे असा परिवार असून भानुदास गायकवाड यांनी चेंबूर मुंबई येथे आरसीएफ येथे ३८ वर्षे नोकरी करत माथाडी युनियनचे लीडर म्हणून काम पाहिले होते आंबेडकरी चळवळीत यांचे मोठे योगदान होते त्यांचा अंत्यविधी पिंपरी (घाटा ) येथे शोकाकुल वातावरणात करण्यात आला यावेळी सामाजिक राजकीय दली चळवळीतील नेते मंडळी उपस्थित होते.



# स्व.संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शोधून कडक शासन करा

## वाल्मिक कराड यांच्यावरील खोटा गुन्हा मागे घ्या; परळीत महायुतीच्या वतीने पोलीस प्रशासनास निवेदन

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करावे तसेच त्यांच्यावर जलद गती न्यायालयात खटला चालवून त्यांना कठोरात कठोर शासन करावे; त्याचबरोबर परळीचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वाल्मिक कराड यांच्यावर राजकीय अकसातून




लावण्यात आलेला खंडणीचा खोटा गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आज परळी महायुतीच्या वतीने पोलीस प्रशासनास निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज परळी शहर पोलीस ठाण्यात याबाबतचे निवेदन सादर केले आहे.

केज तालुक्यातील स्व.संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या ही मानवतेला काळिमा फासणारी आहे, या दुर्दैवी घटनेतील उर्वरित आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यात यावे, तसेच ज्येष्ठ नेते वाल्मिक कराड यांच्यावर अवादा एनर्जी ◀◀ पान २ वर

# शासकीय अधिकाऱ्यांनी कामाबाबत सकारात्मकता दाखवून गेल्या दहा वर्षातील रेंगाळलेली कामे तातडीने पूर्ण करावीत

## नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांची विकास आढावा बैठकीत सूचना

**आष्टी । प्रतिनिधी**

सन २०१४ पासून आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताची अनेक कामे रखडली असून या कामांना प्राधान्याने गती देऊन ही कामे पूर्ण करावीत..यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी कामात सकारात्मकता दाखवावी विकास कामे करताना कोणताही भेदभाव




न ठेवता कठोर भूमिका ठेवून काम करा तुम्हाला काम करताना काही अडचणी आल्यास मी तुमच्या पाठीमागे खंबीर उभा आहे मात्र तुम्ही देखील आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सतर्क रहावे अशा सूचना नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील सर्व खाते ◀◀ पान २ वर

# दत्तजयंती उत्साहात साजरी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दत्तजयंती नवरात्र महोत्सव वैविध्यपूर्ण कार्यक्रमाने उत्साहात संपन्न झाला.



महोत्सवात अंबड ( जि. जालना) येथील संजय देशमुख यांचे सर्वज्ञ दासोपंत यांच्या पंचीकरण पासोडी ग्रंथांतील अंतरंग या विषयावर प्रवचन झाले त्यांनी पासोडी हा ग्रंथ मराठी संत वाड्मयात अव्दितीय असून त्यातून त्यांनी विवरणात्मक मांडणी करून पंचीकरणाचे तत्व विषद केले आहे असे सांगितले.गायक जयेंद्र कुलकर्णी यांनी दत्त माहात्म्यचे गायन केले ॲड.मेधा जोशी यांनी प्रवचनातून संत साहित्यावर प्रकाश टाकला गीता मंडळाच्या वतीने गीतापाठ कार्यक्रम झाला ह.भ.प. बाळकृष्ण कुलकर्णी यांनी किर्तनातून संत उपदेश केला. विष्णू ◀◀ पान २ वर

# संविधान चौक नासधुस करणाऱ्या माते फिरूंना कडक शासन करा

**पाटोदा । प्रतिनिधी**

**परभणी येथे घडलेला प्रकार हा आतिशय क्लेश दायक आहे.भारतातील सर्व घटकांना न्याय देण्याचं काम संविधानाच्या माध्यमातून होत आहे व अशा महान संविधानाची प्रतिकृती असलेले परभणी येथे चौकाचे नासधुस एका माथेफिरू कडूनकडून झालेले आहे. त्या माथेफिरुवर देशदेशद्रोहाचा व फाशीची शिक्षा देण्यात यावी असे मागणी पाटोद्यातील सर्वपक्षीय व समस्त आंबेडकर अनुयायी यांनी दिलेली आहे.**




याप्रसंगी रिपाईचे नेते डॉ.नरेंद्र जावळे बहुजन विकास मोर्चाचे नेते गोरख झेंड मुकुंद शिंदे शिवसेना तालुकाप्रमुख (ठाकरे गट) आमंथ जावळे (ऑल इंडिया पँथर सेना तालुकाध्यक्ष)सय्यद.साजेद आंबेडकर उत्सव समिती अध्यक्ष (पाटोदा शहर) अतुल देवडे (बहुजन विकास मोर्चा जिल्हा समन्वयक) रमेशवरभवन सुरज जावळे प्रकाश जावळे बाबासाहेब उबाळे संदीप घुमरे हिरामण गायकवाड ऋषिकेश जावळे ( शहराध्यक्ष पँथर सेना) प्रवीण (नंदू )जावळे ज्ञानोबा गायकवाड रोहित जाधव विजय अहिरे संपत आढागळे सुनील देशमाने व इतर संविधान प्रेमी उपस्थित होते.

# कै. रामदास दशरथ यमपुरे यांच्या चौथे पुण्यस्मरण निमित्त सोमवारी बबन महाराज मंझेरीकर यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

रामदास दशरथ यमपुरे यांच्या चौथ्या पुण्यतिथी निमित्त बीड तालुक्यातील उदंड वडगाव येथे बबन महाराज मंझेरीकर यांचे सोमवार दि.१६ डिसेंबर रोजी रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तन होणार आहे. त्यानंतर रात्री १० ते १२ या वेळेत खुळे महाराज यांचे भारूड होणार आहे.



उदंड वडगाव शिवाजीनगर येथे रामदास दशरथ यमपुरे यांच्या पुण्यतिथी निमित्त कीर्तन अन्? भारूडाचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करण्यात येत आहे. यंदा चौथ्या पुण्यतिथी निमित्त १६ डिसेंबर रोजी कीर्तन अन्? भारूड होणार आहे. तरी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन शहाजी रामदास यमपुरे, धनंजय रामदास यमपुरे, चंद्रकांत रामदास यमपुरे व समस्त यमपुरे परिवार यांनी केले आहे.

# आज ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचा समारोप

## विविध चर्चा सत्राचे आयोजन; नागरीकांना सहभागी होण्याचे स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईच्या वतीने येत्या १४ व १५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचा आज समारोप होणार आहे. आज या साहित्य संमेलनात तीन परिसंवाद आणि सायंकाळी ४ वाजता समारोपीय सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमास शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अधिकाधिक साहित्यिकांनी सहभागी व्हावे याचे आवाहन स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी केले आहे.**

मराठवाडा साहित्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने प्रति दोन वर्षी अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते. लोकाश्रयावर आधारीत असलेले हे ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलन यावर्षी १४ डिसेंबर रोजी या संमेलनाचा उद्घाटन सोहळा, निमंत्रितांचे कवी संमेलन व खुले कवी संमेलन अतिशय उत्साहाच्या वातावरणात पार पडले.

आज या संमेलनाचा दुसरा दिवस असून सकाळी १० ते १२ या कालावधीत ''नव्या शैक्षणिक धोरणात भाषा शिक्षण'' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. सिध्देश्वर बिराजदार हे राहणार आहेत तर परिसंवादात श्रीधर नागरगोजे, राम शेळके आणि सय्यदा सालेमला जबी हे सहभाग घेणार आहेत. दुपारी १२ ते १ या वेळ चहलपहल साठी राखीव ठेवण्यात आला आहे. दुपारी १ ते ३ या कालावधीत संमेलन अध्यक्षांच्या साहित्यावरील परिसंवाद'' आयोजित ◀◀ पान २ वर

# पिकावर घाटेअळीचा प्रादुर्भाव, ढगाळ वातावरणाचा हरभरा पिकाला फटका

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्याच्या ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावर घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच रात्र मोठी असल्यामुळे घाटेअळीचे पतंग मोठया प्रमाणावर अंडी घालतात. या सर्व बाबी घाटेअळीच्या प्रादुर्भावासाठी पोषक असल्यामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात होऊ शकतो. बऱ्याच ठिकाणी घाटेअळीचा प्रादुर्भाव सुरू झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाटेअळी व्यवस्थापन



करावे, असे आवाहन कृषी विभागाचे तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी केले आहे.

चांगल्या पावसामुळे यंदा हरभऱ्याच्या क्षेत्रात वाढ झालेली आहे. मात्र, यावर आता घाटेअळीचा प्रादुर्भाव सुरु झाला आहे. ही कीड बहुभक्षी असून विशेषत: पीक फुलोरा आणि प्रामुख्याने घाटे अवस्थेत नुकसानकारक असते. लहान अळ्या सुरुवातीला कोवळी पाने, कळ्या व फुले कुरतडून खातात. घाटे लागल्यानंतर अळ्या घाटे कुरतडून त्यास छिद्र पाडुन डोके आत खुपसून आतील दाणे खातात. साधारणत: एक अळी तीस ते चाळीस घाट्यांचे नुकसान करु शकते. सध्या आढळणारी कीड ही अंडी अवस्था व प्रथम अवस्थेतील अळी अवस्था असल्यामुळे वेळीच उपाय योजना केल्यास कमी खर्चात किडींचे प्रभावी व्यवस्थापन होऊ शकते. मिडिया, यु ट्युब माध्यमातून कृषी विभागाचे तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी आवाहन केले. घाटेअळी व्यवस्थापनासाठी कोळपणी किंवा निंदणी करुन पीक तणविरहित ठेवावे. घाटेअळीच्या मोठ्या अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुस्तक महोत्सव उपक्रमाला हवी ती मदत करु- फडणवीस

पुणे । प्रतिनिधी

पुस्तक महोत्सवासाठी पुण्यासारखं दुसरं चांगलं शहर असू शकत नाही. पुस्तक महोत्सवाच्या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी शासन म्हणून मी हवी ती मदत करायला तयार आहे. मराठी भाषेला आता अभिजात भाषा म्हणून गौरविण्यात आलेलं आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मराठीचा सन्मान केल्याचं फडणवीसांनी नमूद केलं. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी पुणे दौऱ्यावर होते. पुण्यातील पुस्तक महोत्सवाला फडणवीसांनी भेट दिली. यावेळी त्यांनी एक गोड खंत बोलून दाखवली. शिवाय पुण्याच्या पालकमंत्री पदाबाबतही प्रतिक्रिया दिली.



पुस्तक महोत्सवाच्या दुसऱ्या पर्वाच्या उद्घाटनाला बोलावल्याबद्दल फडणवीसंनी आभार व्यक्त केले. ते म्हणाले की, पुन्हा पुन्हा यावं असा हा कार्यक्रम आहे. प्रमोद महाजन साहेब असं नेहमी म्हणायचे सुज्ञ माणसाने एका कार्यक्रमात दोनदा जाऊ नये, कारण मागच्या वेळेस जे बोलला ते जर परत बोलला तर म्हणतात की पहा मागच्या वेळेस तेच बोलला होता आणि वेगळं बोलला तर म्हणतात काही अर्थ नाही मागच्या वेळेस वेगळे बोलला होता आता वेगळं बोलला. पुस्तक महोत्सवाच्या कार्यक्रमात पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, महोत्सवामध्ये मला फिरवता, पुस्तकं दाखवता. परंतु महोत्सवाच्या बाजूला असलेल्या खाद्य महोत्सवाकडे नेत नाहीत. हे पुढच्या वेळी चालणार नाही. पुढचा वेळ आताच राखून ठेवा.

# मावळातील आदिवासी महिलांनाही मिळणार पीएम मातृवंदना योजनेचा लाभ

पुणे । प्रतिनिधी

मावळ लोकसभा मतदारसंघात आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. या महिलांना कागदपत्रांअभावी प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचा लाभ घेताना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातून मार्ग काढण्याची मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे लोकसभेत केली. त्यावर आदिवासी पाड्यावरील महिलांनी अपत्य झाल्यानंतर केव्हाही अंगणवाडी, आशा सेविकांच्या माध्यमातून अर्ज करावा. त्यांना लाभ दिला जाईल अशी ग्वाही केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी दिली.



प्रधानमंत्री मातृवंदना योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलेला पहिल्या अपत्यासाठी ५ हजार रुपयांची रक्कम दोन हप्त्यांत, तर दुसरे अपत्य मुलगी झाल्यास मुलीच्या जन्मानंतर एकाच टप्प्यात ६ हजार रूपयांचा लाभ आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफिसमधील खात्यात डीबीटीद्वारे जमा केला जात आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांना येत असलेल्या समस्यांबाबत खासदार श्रीरंग बारणे यांनी तारांकीत प्रश्न विचारला होता.

खासदार बारणे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब, मजदूर या वर्गातील गरोदर महिलांसाठी प्रधानमंत्री मातृवंदना योजना सुरू केली आहे. गरीब महिलांसाठी अतिशय लाभदायक आणि महत्वाची ही योजना आहे. या योजनेतील महिला लाभार्थ्यांना विविध अडचणीचा सामना करावा लागत आहे. कागदपत्रे, लग्नाच्या अगोदरच आधारकार्ड वरील नाव, बँकेत खाते नसणे अशा अडचणींना सामोरे जावे लागते. या योजनांचा लाभ घेण्यासाठी ज्या अडचणी आहेत. त्या दूर करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जाणार आहेत. ही योजना आदिवासी महिलांपर्यंत पोहोचविली पाहिजे. मावळ लोकसभा मतदारसंघातील एका तालुक्यात आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. या लोकांपर्यंत योजना पोहोचविली पाहिजे. त्यासाठी प्रयत्न करावेत. त्यांना लाभ मिळवून द्यावा अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी म्हणाल्या, महिलांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. महिला, मुले सदृढ राहिले तरच सशक्त भारत होईल. प्रधानमंत्री मातृवंदना योजनेंतर्गत गरोदर महिलांना आर्थिक साहाय्य दिले जाते. समाजातील वंचित महिलांना मातृत्व लाभ देण्याचा योजनेचा हेतू आहे. या योजनेचा महिलांना लाभ घेण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पेपरलेस कामकाज सुरू केले आहे. त्यासाठी नवीन सॉफ्टवेअर बनविले आहे. स्वतः महिला यावर अर्ज करू शकतात. अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांच्या माध्यमातून अर्ज करू शकतात. डीबीटीच्या माध्यमातून याचे पैसे दिले जातात. आदिवासी पाड्यावरील महिलांनी अपत्य झाल्यानंतर केव्हाही अंगणवाडी, आशा सेविकांच्या माध्यमातून अर्ज करावा. त्यांना लाभ दिला जाईल.

# दोन्ही राष्ट्रवादीने एकत्र येण्याची गरज: सुनंदा पवार

पुणे । प्रतिनिधी

ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा ८५ वा वाढदिवस दिल्ली येथे १२ डिसेंबरला साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त त्यांना अजित पवार, सुनेत्रा पवार, पार्थ व जय पवार, रोहित पवार हे भेटण्यासाठी व शुभेच्छा देण्यासाठी गेले होते. त्यात काही राजकीय कारण असेल, असे मला वाटत नाही. तसेच, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित यावेत, अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. मलाही तसेच वाटतेय, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या आई सुनंदा पवार यांनी केले.




भीमथडी जत्रा या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी त्या कृषी महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१३) सकाळी आल्या होत्या. त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. विखुरलेले राहण्यापेक्षा एकमुठीने पक्ष राहिला, तर महाराष्ट्रात त्याची ताकद चांगली राहील. त्यामुळे शरद पवार, अजित पवार यांच्यासमोर त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांबद्दल मी कार्यकर्त्यांचा आदर करते. माझा राजकारणाशी तसा काहीही संबंध नाही. सामाजिक क्षेत्रात मी गेली ३५ वर्षे काम करते. प्रचार सोडला, तर मी राजकारणात सक्रिय नसते किंवा राजकीय व्यासपीठावर मी कधी जात नाही. त्यामुळे त्या दोघांनी काय निर्णय घ्यायचा, हे त्यांनी ठरवावे. सर्वजण चाणक्य म्हणतात आणि त्यांनी राजकारणात ६० वर्षे काढलेली आहेत, अशा ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पत्नीलाही त्यांच्या मनातील गूढ कळत नाही. मग आम्हाला काय कळणार? त्यामुळे दोन्ही पक्ष एकत्र येण्याबद्दलचा निर्णय ते दोघेच घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# नोकरीच्या आमिषाने दोन युवकांची फसवणूक; तोतया आयपीएस अधिकाऱ्याला अटक

पुणे । प्रतिनिधी

शासकीय नोकरीचे आमिष दाखवून दोघांची ७ लाख ७१ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी वालचंदनगर पोलिसांनी तोतया आयपीएस अधिकार्याला अटक केली. इंदापूर न्यायालयाने त्याला १७ डिसेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.



तौसिम मनियार (वय ३३), असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी करण तनपुरे (वय २३) या युवकाने वालचंदनगर पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ जुलै २०२१ ते १२ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये मनियार याने तनपुरे यांना आरोग्य सेवक, तसेच राज्य उत्पादन शुल्क खात्यामध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून २ लाख ७१ हजार ५०० रुपये घेऊन फसवणूक केली. मनियार याने तनपुरे याला बनावट नियुक्तिपत्र देऊन मुंबई कार्यालयामध्ये हजर राहण्यास सांगितले होते. मात्र, तनपुरे याने चौकशी केली असता, नियुक्तिपत्र बनावट असल्याचे लक्षात आले. तसेच, मनियार याने अक्षय कदम यालाही पोलीस शिपाईपदावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून ५ लाख रुपये घेऊन फसवणूक केली.

# अचानक लागलेल्या आगीत घर, गोठा जळून खाक

पुणे । प्रतिनिधी

पवनानगर मावळ तालुक्यात शुक्रवारी रात्री एक दुर्दैवी घटना घडली. पवन मावळ परिसरातील शिवली गावच्या हद्दीतील खडकवाडी येथे अचानक लागलेल्या आगीत एक घर आणि शेजारीच असलेला जनावरांचा गोठा पूर्णतः जळून खाक झाला आहे. शुक्रवारी (दि.१३) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

येथील दत्तू गणपत ठाकर यांचे हे घर व रामदास जाधव यांचा जनावरांचा गोठा होता. रात्री नऊच्या सुमारास अचानक आग लागल्याने घर आणि गोठा दोन्ही आगीत भस्मसात झाले. घरामध्ये केवळ वयस्कर आजी या एकट्याच असल्याने त्यांनी प्रसंगावधान राखून घरातून बाहेर धाव घेतली. त्यामुळे त्यांचा जीव बचावला व सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही.परंतु दुर्घटनेत घराचे बांधकाम हे लाकडी असल्याने घरासह घरातील सर्व साहित्य त्यामध्ये ३०-३५ पोती धान्य, संसारपयोगी वस्तू, घराच्या नूतनीकरणासाठी आणलेले लोखंडी व सिमेंटचे पत्रे, दागिने महत्वाची कागदपत्रे हे सर्व जळून खाक झाले आहे. यासह गोठ्यातील दोन जनावरे देखील होरपळून निघाली आहेत. त्यामुळे पीडित कुटुंबाचे मोठे नुकसान झाले असून या कुटुंबाने मदतीसाठी प्रशासनाला हाक दिली आहे. ''वडील रात्री कीर्तनासाठी गेल्याने आई घरात एकटीच होती. काल रात्री नऊच्या सुमारास घरामध्ये अचानक आग लागली. या आगीत आमचे घर संपूर्ण जळाले आहे. तसेच आमची दोन जनावरे देखील भाजली आहे. शेजाऱ्यांच्या मदतीने जनावरे व आई बचावली. परंतु घर जळाल्याने घरासोबत आमचा संसार उघड्यावर पडला आहे. घराचे मोठे नुकसान झाले. त्यासोबत इतर संसारोपयोगी वस्तूंचेही नुकसान झाले. त्यामुळे प्रशासनाने आम्हाला मदत करावी, ही आमच्या कुटुंबाची अपेक्षा आहे'', असे सतिश दत्तु ठाकर यांनी सांगितले.

# मित्राला व्यसनमुक्ती केंद्रात घेऊन जाऊ नये म्हणून केला गोळीबार! रूग्णवाहिकेच्या काचा फोडल्या; तिघांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

पुण्यामध्ये दारु पिणाऱ्या मित्राला व्यसनमुक्ती केंद्रात घेऊन जाण्यासाठी आलेल्या रुग्णवाहिकेवर दोन मित्रांनीच हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. परिसरात दहशत माजवण्यासाठी गोळीबार केला आणि रुग्णवाहिकेची तोडफोड केल्याचा प्रकार पुण्यातील वाघोली परिसरात घडला. या प्रकरणी वाघोली पोलिसांत दारु पिणाऱ्या व्यक्तीसह दोन मित्रांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप हरगुडे याच्या कुटुंबियाने त्याला व्यसनमुक्ती केंद्रात घेऊन जाण्यासाठी सांगितलं आणि त्यांच्या सांगण्यावरुन पुण्यातील जागृती व्यसनमुक्ती केंद्रातून संदीपला घेऊन जाण्यासाठी रुग्णवाहिका आली. त्यावेळी संदीपने आपल्या दोन मित्रांना 'हे मला घेऊन जात आहे, यांना सोडू नको' म्हणत दारुच्या नशेत आरडा ओरड केली होती. त्यावेळी मित्रांना संदीपला ओढत नेत असल्याचं पाहिलं आणि थेट परवाना असलेल्या बंदूकीतून हवेत गोळीबार केला. गुरुवारी रात्री साडे नऊच्या सुमारास ही घटना घडली होती.




त्यानंतर संदीपचे मित्र विशाल कोलते आणि अमोल हरगुडे यांनी दहशत माजवण्यासाठी थेट रूग्णवाहिका फोडली. सुदैवाने यात कोणालाही दुखापत झाली नाही. पोलिसांनी या तिघांवर गुन्हा दाखल केला आहे आणि रिवॉल्व्हर जप्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मित्राला व्यसनमुक्ती केंद्रात घेऊन जाऊ नये म्हणून त्याच्या मित्राने नशेतच रुग्णवाहिका चालकाच्या दिशेने बंदुकीतून दोन गोळ्या झाडल्या. याशिवाय रुग्णवाहिकेवर दगडफेक करून काचा फोडण्यात आल्या. या घटनेत सुदैवाने कोणीही जखमी झालेले नाही. पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. विशाल रामदास कोलते (वय ३२, रा. बकोरी, ता. हवेली), संदीप कैलास हरगुडे (वय ४२) आणि अमोल राजाराम हरगुडे (वय ३६, दोघे रा. केसनंद, ता. हवेली) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. याबाबत रुग्णवाहिका चालक सुधाकर अरुण कानडे (वय ३५, रा. कात्रज ) यांनी फिर्याद दिली आहे. बकोरी फाट्यावरील एका बारमध्ये गुरुवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास हे सर्वजण दारू पित होते. रुग्णवाहिका चालक सुधाकर संदीपला लोणी काळभोरमधील व्यसनमुक्ती केंद्रात नेण्यासाठी आले. त्यांना विरोध करण्यासाठी संदीपने विशालला चिथावणी दिली. त्यामुळे विशालने रागाच्या भरात परवानाधारक बंदुकीतून त्यांच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्या. मात्र यामध्ये कोणतीही जिवीत हानी झाली नाही. त्यानंतर विशाल आणि अमोल यांनी रुग्णवाहिकेवर दगडफेक करून काचा फोडल्या.या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक पंडित रेजितवाड कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी विशाल व अमोल या दोघांना तत्काळ ताब्यात घेतलं. संदीपच्या कुटुंबीयांनी त्याला व्यसनमुक्ती केंद्रात पाठवलं होतं, परंतु तो तेथून दोन वेळा निघून आला. तो कुटुंबीयांना त्रास द्यायचा. गुरुवारी त्याच्या कुटुंबीयांनी व्यसनमुक्ती केंद्रात फोन करून त्याला नेण्यासाठी सांगितले. त्यामुळे केंद्रातील कर्मचारी त्याला नेण्यासाठी आले होते. मात्र दारूच्या नशेत तिघांनी मोठा गोंधळ घातला आणि गोळीबाप करत रूग्णवाहीकेची तोडफोड केली.

# 'आता विभागीय मंडळांवरही साक्षरता कार्यक्रमाची जबाबदारी'; राजेश क्षीरसागर यांची राज्य समन्वयक म्हणून नियुक्ती

पुणे । प्रतिनिधी

उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाची क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आता विभागीय मंडळांवरही कार्यक्रमाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. कोल्हापूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांची राज्य समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उल्लास नव भारत साक्षरता हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सन २०२२ ते २०२७ या कालावधीत देशभर राबवला जात आहे. राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी योजना शिक्षण संचालनालयाकडून ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने आढावा घेण्यात येतो व क्षेत्रभेटी देण्यात येतात. यातून क्षेत्रीय स्तरावर या कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक असल्याचे दिसून आले आहे.




या योजनेत निरक्षरांचे सर्वेक्षण व स्वयंसेवक सर्वेक्षण, त्यांची उल्लास ॲापवर ऑनलाइन नोंदणी व जोडणी, अध्ययन अध्यापन, परीक्षेचा सराव, परीक्षा पूर्व व परीक्षोत्तर कामकाजाची कार्यवाही तसेच क्षेत्रिय स्तरावरील जिल्हा, तालुका, शाळास्तर समित्यांचे कामकाज या बाबींचा वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक आहे. विभागीय शिक्षण उपसंचालक, डायट प्राचार्य, शिक्षणाधिकारी यांचा या योजने संदर्भातील कामकाजाचा आढावा, योजनेची प्रसिद्धी, उद्दिष्टानुसार केले काम याबाबत विभागीय समन्वयकांनाही आता लक्ष घालावे लागणार आहे. चालू वर्षीची असाक्षर ऑनलाइन नोंदणी व त्यापुढील कार्यवाही सुरू आहे. इयत्ता आठवी व त्यापुढील शालेय विद्यार्थ्यांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी प्राचार्य व मुख्याध्यापकांच्या बैठकांमध्ये याचा आढावा घेण्याचे निर्देश विभागीय मंडळांना संचालकांनी दिले आहेत. राज्य समन्वयक कोल्हापूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर व विभागीय समन्वयकपदी रत्नागिरी मंडळ वगळता संबंधित विभागीय मंडळाच्या अध्यक्षांची नेमणूक करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी आणि योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संयुक्तपणे जारी केले आहेत. सध्या विभागीय अध्यक्ष म्हणून राजेंद्र अहिरे-मुंबई, डॉ. सुभाष बोरसे -नाशिक, मंजुषा मिसकर-पुणे, अनिल साबळे-छत्रपती संभाजी नगर, सुधाकर तेलंग-लातूर, नीलिमा टाके-अमरावती, माधुरी सावरकर-नागपूर हे काम पाहत आहेत. उल्लास योजनेतील अनुभव लक्षात घेता आदेशानुसार राजेश क्षीरसागर यांना राज्य समन्वयक, कोल्हापुर विभाग समन्वयक आणि रत्नागिरी विभाग समन्वयक म्हणून काम पहावे लागणार आहे.

# मरकळ पंचलिंगमाळावर दत्तजन्मोत्सव हरिनाम गजरात

आळंदी । अर्जुन मेदनकर

श्रीक्षेत्र मरकळ ( मारूतीनगर ता.खेड ) येथील जागृत, पुरातन पंचलिंगमाळावरील दत्तमंदिरात टाळ-मृदंगाच्या गजरात श्री दत्त जन्मोत्सवा निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात विश्वकर्मा महाराज पांचाळ यांचे जन्मोत्सव कीर्तनासह विविध धार्मिक कार्यक्रमांनी हरिनाम गजरात श्री पंचलिंग गुरुदेव दत्त देवस्थान ट्रस्ट अध्यक्षा ह.भ.प. ताईमाऊली महाराज यांचे मार्गदर्शनात श्री दत्त जन्मोत्सव सोहळा झाला. यावेळी परिसरातील भाविक, नागरिक यांनी श्रींचे दर्शनास मोठी गर्दी केली.दर्शन, महाप्रसाद मोठ्या उत्साहात वाटप करण्यात आला. या निमित्त पंचक्रोशीतील भाविक, नागरिकांना हरिकीर्तन सेवेच्या श्रवणाची पर्वणी लाभली.

पंचलिंग गुरुदेव दत्त प्रतिष्ठानच्या वतीने हरिनाम सप्ताहाचे आयोजन जन्मोत्सव सोहळा म्हणून करण्यात आले. या सप्ताहात विविध उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात असेल. नी या प्रसंगी पंचलिंग देवस्थान अध्यक्ष ताई माऊली महाराज, मी सेवेकरी फाउंडेशन अध्यक्ष सुधीर मुंगसे, पुणे जिल्हा वारकरी महामंडळाचे अध्यक्ष विलास महाराज बालवडकर, मराठी पत्रकार परिषद पुणे विभागीय सचिव गणेश मोकाशी, पत्रकार अनुष्का कोंड्रा, राजेश नागरे संचालक संतोष कुंभार, मरकळ उपसरपंच सतीश लोखंडे, ग्रामपंचायत सदस्य भानुदास लोखंडे, विद्यमान सरपंच बाजीराव लोखंडे, विद्यमान चेअरमन बाळू टाकळकर, गोरक्ष महाराज वर्पे, माजी पंचायत समिती सदस्य तुकाराम वहिले, देवस्थान सदस्य संभाजी ज्ञानोबा लोखंडे, किरणशेठ लोखंडे, संतोष कुंभार, हिरामण लोखंडे, मयुर चव्हाण, सतिश लोखंडे, भानुदास लोखंडे,





शंकर वरपे, हनुमंत आव्हाळे, पंडित बिराजदार, हनुमंत आदलकार, पुजारी स्वामी सूर्यवंशी, लक्ष्मण नेटके, कैलास होले, शिवाजी शंकर मोशेरे, आळंदी शहर शिवसेना शाखा प्रमुख रोहिदास कदम, तंटामुक्त समिती अध्यक्ष किरणशेठ लोखंडे, मोई ग्रामपंचायत सरपंच चंदनशेठ मुऱ्हे आदी उपस्थित होते. या सोहळ्यात श्री गुरु चरित्र पारायण, जप, यज्ञ, हरिनाम, पुष्प सजावट, दीपोत्सव, मंदिरास लक्षवेधी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सोहळ्याचे ग्रंथ पूजन पुणे जिल्हा वारकरी महामंडळाचे अध्यक्ष विलास महाराज बालवाडकर यांचे हस्ते झाले.

श्री पंचलिंग गुरुदेव दत्त देवस्थान ट्रस्ट , श्री रामकृष्ण वारकरी शिक्षण संस्था अनाथ आश्रम मरकळ यांचे वतीने दत्तजयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविक नागरिक, वारकरी यांनी या जन्मोत्सवास उपस्थित होते. येत महिला भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती. काल्याचे कीर्तन सेवा गोरक्ष महाराज वर्पे यांची होत असल्याचे ताई माउली महाराज यांनी सांगितलें.

श्री दत्तजन्मोत्सव सोहळ्यासाठी पुणे, रायगड, कोकण, मुंबई येथील दत्तभक्त, भाविक मरकळच्या दत्तमंदिरात दर्शनास मोठ्या संख्येने आले होते. मंदिर परिसरात या निमित्त लक्षवेधी भगव्या पताका, भगवे ध्वज, आकर्षक विद्युत रोषणाई, विविध रंगीबेरंगी आकर्षक पुष्प सजावट करण्यात आली होती. विविध फुलांची सजावट केल्यामुळे मंदिरे लक्षवेधी दिसत होते. वारकरी भजन, दत्तभजन यांच्या सुमधुर आवाजाने मंदिरासह परिसर धार्मिक भक्तिमय वातावरणात दुमदुमला. हरी ओम तत्सत, जय गुरुदत्त दत्त या मंत्राचा अखंड जप झंझाळ. ज्ञानेश्वरी व गुरुचरित्र पारायणाचे वाचन, अखंड हरिनाम सप्ताहात भक्तिमय वातावरणात झाले. दिपप्रज्ज्वलन, वीणा पुजन, गुरुचरित्र आणि ग्रंथ पूजन, प्रतिमा पूजन, श्रीनां अभिषेक, पूजा, आरती असे भरगच्च धार्मिक कार्यक्रम झाले. अखंड हरिनाम सप्ताहात दररोज काकडा आरती, नित्य आरती, पारायण, होमहवन, भजन सेवा, हरिपाठ, आरती, किर्तन, अन्नदान, हरिजागर आदी धार्मिक कार्यक्रम परंपरेने झाले. यासाठी ताई माउली महाराज यांनी नियोजन केले. आळंदी, मरकळ व परिसरातील नागरिक, भाविकांना मोठ्या मंगलमय धार्मिक वातावरणात अन्नदान महाप्रसाद तसेच श्रींचा जन्मोत्सव साजरा केला. यासाठी मरकल ग्रामस्थ, संयोजन समिती, श्री पंचलिंग गुरुदेव दत्त देवस्थान ट्रस्ट आणि राम श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्था अनाथ आश्रम मरकळ यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी गजानन महाराज सोमटकर, काळूराम महाराज घेनंद, बाळा हरगुडे, निरवळ महाराज, चाफेकर महाराज, सुधाकर पठाडे महाराज यांनी गायन साथ दिली मुरलीधर दादा गावडे, सारंग महाराज यांनी मृदंग साथ दिली. अंबादास बेंद्रे कार्तिकी शिंदे रमेश बेंद्रे पप्पू वाजे अक्षय भुसे यांनी तबला साथ दिली. काळूराम महाराज घेनंद यांनी भजन व किर्तन या बाबत नेतृत्व केले. शिवाजी महाराज पवार, राघोजी वाबळे यांनी हार्मोनियम साथ दिली. ज्ञानेश्वर नाणेकर यांनी विणेकरी म्हणून कामकाज पाहिले.

जन्मोत्सव सोहळ्यात ज्ञानेश्वरी भजनी मंडळ, तुळापूर भजनी मंडळ, जोगेश्वरी महिला भजनी मंडळ, साई दत्त भजनी मंडळ, भजनी मंडळ केळगाव, ग्रामस्थ भजनी मंडळ, चिंबळी ग्रामस्थ भजनी मंडळ, वडगाव काकडे भजनी मंडळ, भैरवनाथ ग्रामस्थ भजनी मंडळ यांनी जन्मोत्सव काळात संगीत भजन सेवा रुजू केली. श्री गुरुदेव दत्त जन्मोत्सवा निमित्त आळंदी पंचक्रोशीतील विविध मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांनी दत्त जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.